७० वर्ष

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०९५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## रुपाली चाकणकरांची चौकशीला दांडी



पुणे (दै. संध्या) : राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी भोंदू अशोक खरात प्रकरणाचा तपास करणाऱ्या एसआयटीपुढे हजर राहण्यास टाळाटाळ सुरू केली आहे. आज त्यांची या प्रकरणी चौकशी होण्याची शक्यता होती. पण त्यांनी महिला असल्यामुळे प्रवास करण्यास असमर्थ असल्याचे नमूद करत ही चौकशी टाळली आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी चाकणकरांनी दिलेले कारण अत्यंत विक्षिप्त व क्षुल्लक असल्याचा आरोप केला आहे. रुपाली चाकणकर ह्या भोंदू अशोक खरातच्या शिवनिका ट्रस्टवर सदस्या आहेत. त्यांच्यावर भोंदू खरातचे प्रकरण दाबण्यासाठी पोलिसांवर दबाव टाकल्याचाही आरोप आहे. हे प्रकरण चव्हाट्यावर आल्यानंतर त्यांना प्रथम राज्य महिला आयोग व त्यानंतर सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला.

# तरच एलपीजी सिलिंडर सेवा बंद : भुजबळ

नाशिक (दै. संध्या)



राज्यात एलपीजी सिलेंडर आणि इंधन तुटवड्याच्या अफवा वेगाने पसरत असताना अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट भूमिका मांडली आहे. राज्यात कोणत्याही प्रकारचा गॅस किंवा इंधन तुटवडा नसून भारत सरकारकडे पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि अनावश्यक साठेबाजी करू नये, असे आवाहन त्यांनी केले.

भुजबळ यांनी स्पष्ट केले की, काही शहरांमध्ये पीएनजी सुविधा उपलब्ध असूनही अनेक नागरिकांनी त्यासाठी अर्ज केलेला नाही. अशा ठिकाणी, जर पीएनजी लाईन पूर्णपणे कार्यान्वित झाली आणि नागरिकांनी तीन महिन्यांच्या आत अर्ज केला नाही, तर त्या भागात एलपीजी सिलिंडर सेवा बंद केली जाऊ शकते. मात्र, हा नियम संपूर्ण राज्यासाठी लागू नसून केवळ पीएनजी सुविधा उपलब्ध असलेल्या शहरी भागांपुरता मर्यादित असेल, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक स्तरावर इंधन पुरवठ्यावर परिणाम होत असला, तरी भारतात परिस्थिती नियंत्रणात असल्याचे भुजबळ यांनी स्पष्ट केले. रशिया आणि व्हेनेझुएला यांसारख्या देशांकडून इंधन पुरवठा सुरू असून भारतीय जहाजे नियमितपणे ये-जा करत आहेत, त्यामुळे नागरिकांनी चिंता करण्याचे कारण नाही, असे त्यांनी नमूद केले. याशिवाय, व्यावसायिक वापरासाठी गॅस पुरवठ्यात 50 टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. एलपीजी साठाही मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आला असून पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सरकारकडून आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत. तसेच, ज्या नागरिकांनी पीएनजीसाठी अर्ज केला आहे पण अद्याप लाईन पोहोचलेली नाही, त्यांना एलपीजी सेवा सुरूच राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### रेशन धान्याचा पुरेसा साठा उपलब्ध

राज्यात रेशन धान्याचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांना तीन महिन्यांचे धान्य एकाचवेळी घेण्याची मुभा देण्यात आली आहे. केरोसीनही उपलब्ध करून दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. पीएनजी लाईनसाठी वेगळी परवानगी घेण्याची गरज नसून सरकारच ती सुविधा देणार आहे. तसेच, राज्यात कोणत्याही प्रकारचा लॉकडाऊन लागू होणार नसल्याचे भुजबळ यांनी स्पष्ट करत नागरिकांना दिलासा दिला आहे.

## ढिंग-टांग




## ब्रेकिंग न्यूज

### कारखान्याच्या बगॅसला अचानक आग

पाटस (दै. संध्या) : पाटस (ता. दौंड) येथील भीमा सहकारी साखर कारखान्याच्या बगॅसला अचानक लागलेल्या आगीमुळे बगॅसचे मोठे नुकसान झाले मात्र या घटनेत कुठलीही जीवितहानी झालेली नाही. दरम्यान एक ट्रक आगीत जळून खाक झाला आहे. नेमकी आग कशाने लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झाली नाही.आज सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास कारखाना परिसरात ठेवलेल्या बगॅसला आग लागली. हवेचे प्रमाण जास्त असल्यामुळे आगीचे लोळ मोठ्या प्रमाणात फोफावत होते. आग लागली असल्याचे समजतात कारखान्याच्या कामगारांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला. दरम्यान घटनेचे गांभीर्य लक्षात घेता कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील चार अग्निशामक बंब तातडीने घटनास्थळी दाखल झाले. दुपारनंतर आग आटोक्यात आली होती. बगॅस भरण्यासाठी एक ट्रक उभा होता बगॅसला आग लागल्यानंतर आगीचे लोळ ट्रकवर आल्याने ट्रक जळून खाक झाला. घटनास्थळी पाटस पोलीस चौकीच्या पोलिसांनी परिस्थितीची पाहणी केली.

### नीलम गोऱ्हे यांची चौकशी करा : देसाई


पुणे (दै. संध्या) : राज्यात गाजत असलेल्या भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात आता नवे वळण आले असून सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी नीलम गोऱ्हे यांच्यावर गंभीर आरोप करत सखोल चौकशीची मागणी केली आहे. ज्या कार्यालयात भोंदू बाबा अशोक खरात याने महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. त्याच ठिकाणी नीलम गोऱ्हे या त्याला भेटण्यासाठी गेल्या होत्या. तसेच, त्या केवळ एकदाच नव्हे तर अनेकदा त्याच्याशी संपर्कात असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. देसाई यांच्या म्हणण्यानुसार, नीलम या विधान परिषद आमदारकीच्या प्रयत्नात असताना देखील अशोक खरात याला भेटण्यासाठी गेल्या होत्या. तसेच मंत्रीपदाच्या शर्यतीत असताना देखील त्यांनी त्याची भेट घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. या भेटींचा उद्देश "हात दाखवणे", पूजा किंवा अन्य कारणांसाठी होता का, याची चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. याशिवाय, नाशिकमधील Express Inn या हॉटेलमध्ये अशोक खरात आणि नीलम गोऱ्हे यांची भेट झाल्याचा दावा करत, त्या वेळी खरातला बंदुकीचे लायसन्स मिळवण्यासाठी मध्यस्थी करण्यात आली का, याचाही तपास करण्याची गरज असल्याचे देसाई यांनी म्हटले आहे.

### सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस

पुणे (दै. संध्या) : पुणे शहरात मार्च महिन्यातच अवकाळी पावसाने हजेरी लावली असून वाढत्या उकाड्यातून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मागील दोन-तीन दिवसांपासून पुण्यात तापमानात मोठी वाढ झाली होती आणि उन्हाचा कडाका जाणवू लागला होता. मात्र अचानक ढगाळ वातावरण तयार होऊन पावसाला सुरुवात झाली आहे.

## शेतकरी केवळ 'उत्पादक' नव्हे तर यशस्वी 'उद्योजक' व्हावा : जयकुमार रावल

मुंबई (दै. संध्या)




बदलत्या परिस्थितीत शेतकरी हा केवळ उत्पादक राहून चालणार नाही, तर तो उत्तम उद्योजक बनला पाहिजे. यासाठी पणन विभागाच्या वतीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. याचबरोबर शेतीमालाच्या उत्पादनासोबतच त्याचे मार्केटिंग, ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि विक्री या सर्व बाबींमध्ये शेतकऱ्यांनी सहभाग घेतला पाहिजे, असे प्रतिपादन पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केले. या प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतकरी उत्पादक संस्थांच्या माध्यमातून चळवळ उभी राहील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण केंद्र येथे आयोजित शेतकरी उत्पादक संस्थांच्या (एफपीओ) राज्यस्तरीय परिषदेचे उद्घाटन पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना पणन मंत्री रावल म्हणाले, राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या बाजार व्यवस्थेपेक्षा अधिक आधुनिक, सुसज्ज आणि जागतिक दर्जाची बाजार साखळी उभारण्याची गरज आहे. यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात वाढवण पोर्ट परिसरात सुमारे १२०० एकरवर अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजार समिती उभारण्याचे नियोजन करण्यात येत आहे. ही बाजारपेठ रस्ता, रेल्वे, बंदर आणि विमानतळाशी जोडलेली असेल, ज्यामुळे राज्यातीलच नव्हे तर देशभरातील शेतीमालासाठी महाराष्ट्र जागतिक व्यापार केंद्र म्हणून उदयास येईल.

## अंगोलाकडून गॅस खरेदी करण्याच्या तयारीत भारतीय कंपन्या

*सरकारी स्तरावरही चर्चा सुरू, होर्मुझ संकटाच्या पार्श्वभूमीवर भारत नवीन पर्यायाच्या शोधात*

नवी दिल्ली (दै. संध्या)




भारतात वायूच्या तुटवड्यामुळे सरकारी तेल आणि वायू कंपन्या आता नवीन देशांकडून पुरवठ्याचे पर्याय शोधत आहेत. याच अनुषंगाने इंडियन ऑइल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड आणि गेल (इंडिया) लिमिटेड आफ्रिकन देश अंगोलाच्या सरकारी कंपनी सोनानगोलकडून घरगुती गॅस (LPG) आणि नैसर्गिक वायू (LNG) खरेदी करण्यासाठी चर्चा करत आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, या कंपन्या अंगोलाच्या सरकारी कंपनी सोनानगोलसोबत दीर्घकालीन करार (टर्म कॉन्ट्रॅक्ट) करण्यावर विचार करत आहेत. तथापि, चर्चा अजून प्राथमिक टप्प्यात आहे आणि सरकार-ते-सरकार स्तरावरही चर्चा सुरू आहे. ही परिस्थिती यासाठी निर्माण झाली आहे, कारण मध्यपूर्वेत सुरू असलेल्या युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनी बंद झाली आहे. हा मार्ग जगात तेल आणि वायूच्या पुरवठ्यासाठी खूप महत्त्वाचा मानला जातो. तो बंद झाल्यामुळे भारतासह अनेक देशांचा पुरवठा प्रभावित झाला आहे.

भारत जगातील दुसरा सर्वात मोठा एलपीजी ग्राहक आहे आणि आपल्या गरजेच्या सुमारे 60% आयात करतो. तसेच, सुमारे 50% एलएनजी देखील आयात करतो. आतापर्यंत भारताला बहुतेक गॅस मध्य पूर्वेकडील देशांकडून, विशेषतः कतार आणि यूएईकडून मिळत होता. परंतु होर्मुझ सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे भारताच्या सुमारे 90% एलपीजी आयातीवर परिणाम झाला आहे. याच कारणामुळे सरकारने घरगुती ग्राहकांना प्राधान्य देत गॅस सिलेंडर बुकिंगचे नियम कडक केले आहेत. आता शहरांमध्ये 25 दिवस आणि गावांमध्ये 45 दिवसांच्या अंतरानेच सिलेंडर बुक करता येईल. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, आफ्रिकेतून गॅसचा पुरवठा अमेरिकेच्या तुलनेत 10 ते 15 दिवस लवकर भारतात पोहोचू शकतो. अशा परिस्थितीत अंगोला भारतासाठी एक चांगला पर्याय ठरू शकतो. जर हा करार झाला, तर अंगोला पहिल्यांदा भारताला स्वयंपाकाचा गॅस पुरवठा करेल.

भारतीय कंपन्या LPG साठी सुमारे एक वर्षाचा आणि LNG साठी किमान 10 वर्षांचा करार करण्यावर विचार करत आहेत. अंगोलाकडे सुमारे 4.6 ट्रिलियन क्यूबिक फूट नैसर्गिक वायूचा साठा आहे आणि तो आधीपासूनच भारताला कच्चे तेल आणि LNG पुरवठा करत आहे. आर्थिक वर्ष 2025 मध्ये अंगोला भारताचा पाचवा सर्वात मोठा LNG पुरवठादार होता.

भारत केवळ अंगोलाच नाही, तर ऑस्ट्रेलिया, अल्जेरिया आणि रशियासारख्या देशांकडूनही गॅस आयातीचे पर्याय शोधत आहे, जेणेकरून एकाच प्रदेशावरील अवलंबित्व कमी करता येईल.

या गॅस संकटाचा परिणाम खत (फर्टिलायझर) आणि स्टील क्षेत्रासारख्या उद्योगांवरही होऊ शकतो. जर ही परिस्थिती दीर्घकाळ टिकून राहिली, तर गॅसच्या किमतीही वाढू शकतात आणि भारताला महागड्या दरात गॅस खरेदी करावा लागू शकतो. पेट्रोलियम मंत्रालयाने म्हटले आहे की, देशात गॅस आणि पेट्रोलियम उत्पादनांचा पुरवठा कायम ठेवण्यासाठी आवश्यक पावले उचलली जात आहेत. अलीकडेच दोन मोठी जहाजे सुमारे 94 हजार मेट्रिक टन एलपीजी घेऊन भारताकडे रवाना झाली आहेत.

## धार्मिक कार्यक्रमांसाठी मदत केली तर चुकले का?

मुंबई (दै. संध्या)



महाराष्ट्राचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी जैन बांधवांच्या उत्सवासाठी त्यांच्या मतदारसंघात मलबार हिल येथे 16 जैन मंदिरांना प्रत्येकी 5 सिलिंडरची मागणी केली होती. ही मागणी त्यांनी पत्राद्वारे राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे केली होती. यावरून वादंग निर्माण झाले आहे. राज्यात गॅस टंचाई असल्याचा शिक्कामोर्तब एका मंत्र्यानेच केला असल्याची टीका विरोधकांनी केली आहे. तसेच लोढा हे राज्याचे मंत्री असून देखील केवळ एका धर्मासाठी अशी मागणी कशी करू शकतात, असा सवालही विरोधकांनी उपस्थित केला आहे. यावर आता लोढा यांनी स्पष्टीकरण दिले आहे. मंगलप्रभात लोढा त्यांच्यावर होत असलेल्या आरोपांवर व टीकेला प्रत्युत्तर देताना म्हणाले, हिंदू सणाच्यावेळी आणि धार्मिक कार्यक्रमांवेळी टीका करायची ही एक फॅशन झाली आहे. माझ्यावर झालेली टीका त्याच नरेटिव्हचा भाग आहे. माझ्या मतदारसंघात रामनवमी, साई भंडारा, जैन धर्माचा कार्यक्रम हे विशेष धार्मिक कार्यक्रम आहे. त्यासाठी गॅसचा साठा नव्हता तर विशेष प्रयत्न करणे गरजेचे होते. माझ्याकडे साई भंडाऱ्याचे लोक आले होते, जैन धर्मीय लोक आले होते. मग त्यांना गॅस सिलिंडर मिळवून देण्यासाठी प्रयत्न करायचा नाही का? मी त्यासाठी प्रयत्न केला तर काही चुकले का? असा प्रतिसवाल लोढा यांनी उपस्थित केला. पुढे बोलताना मंगलप्रभात लोढा म्हणाले, 2 तारखेला हनुमान जयंती आहे, 14 एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आहे. त्यासाठी विशेष धार्मिक कार्यक्रम असल्याने मला प्रयत्न करावा लागणारच आहे. माझी आमदार म्हणून ती जबाबदारी आहे. त्यामध्ये कोणाला गैर वाटत असेल किंवा कोणाला वाद निर्माण करायचा असेल तर त्याने करावा. मी जबाबदारीपासून पळ काढणार नाही. राज्यात गॅसचा तुटवडा नाही, राज्य सरकार चांगलं काम करत आहे. फक्त विशेष धार्मिक कार्यक्रमांच्यावेळी गॅस सिलिंडर मिळवायला प्रयत्न करावे लागतात. त्यामुळे तेढ निर्माण करणे सोडा, असेही त्यांनी म्हटले आहे. मंगलप्रभात लोढा यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, चैत्र महिन्यात एकदाच येणाऱ्या ओली आयंबील हा जैन धर्मातील एक महत्त्वाचा सन आहे. या दिवशी उपवास, पूजा व विशेष धार्मिक विधी मोठ्या भक्तिभावाने पार पाडले जातात. या निमित्ताने मंदिरांमध्ये मोठ्या प्रमाणावर अंबिल (पारंपरिक पेय) तयार करून भक्तांना वितरण केले जाते. माझ्या मलबार हिल विधानसभा मतदारसंघातील 16 जैन मंदिरांमध्ये ओली (अंबिल) निमित्त मोठ्या प्रमाणावर व्यवस्था केली जाते. यासाठी प्रत्येक मंदिरास 5 गॅस सिलिंडरची आवश्यकता आहे. सबब, आपणास नम्र विनंती आहे की, या 16 जैन मंदिरांना प्रत्येकी 5 सिलिंडर उपलब्ध करून देण्यास सहकार्य करावे. जैन धर्मीय समाज आपल्याकडून या बाबतीत सकारात्मक मदतीची अपेक्षा ठेवून आहे. आपल्या सहकार्याबद्दल आम्ही मनःपूर्वक आभारी राहू.

## एकनाथ खडसे कुटुंबाच्या अडचणीत वाढ; गंभीर आरोप

मुंबई (दै. संध्या)



जळगाव जिल्ह्यातील बोदवड पोलिस ठाण्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे आणि त्यांची कन्या शारदा खडसे यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. साखर कारखाना उभारण्याचे आमिष दाखवून शेतकऱ्यांची महार वतन जमीन बळकावल्याचा गंभीर आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे. अनेक वर्षांनंतर हा व्यवहार समोर आल्यामुळे या प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. हे प्रकरण 2002 सालातील असल्याची माहिती समोर आली आहे. भुसावळ तालुक्यातील मानपूर शिवारातील गट क्रमांक 122 मधील जमीन ही चमेलाबाई तुकाराम तायडे आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या मालकीची होती. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, या ठिकाणी 'तापी-पूर्णा सहकारी साखर कारखाना' सुरू करण्याचे आश्वासन देत जमीन खरेदी करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. त्यावेळी जमिनीला चांगला मोबदला देण्यासोबतच कुटुंबातील सदस्यांना कारखान्यात नोकरी देण्याचेही आश्वासन दिले गेले होते.

## लोकसभेत नक्षलवादावर चर्चा; "शस्त्र उचलणाऱ्यांना किंमत मोजावीच लागेल" – अमित शहा

### बस्तरमध्ये नक्षलवाद जवळपास संपुष्टात; सरकारचा दावा, विरोधकांवरही टीका

नवी दिल्ली (दै. संध्या)



देशातील नक्षलवादाच्या प्रश्नावर लोकसभेत सोमवारी झालेल्या चर्चेदरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सरकारच्या भूमिकेचा जोरदार बचाव करत, "जो शस्त्र उचलेल त्याला किंमत मोजावीच लागेल," असा स्पष्ट इशारा दिला. त्यांनी दावा केला की छत्तीसगडमधील बस्तर परिसरातून नक्षलवाद जवळपास संपुष्टात आला असून हा बदल विकास आणि सुरक्षेच्या संयुक्त प्रयत्नांमुळे शक्य झाला आहे.

शहा यांनी आपल्या भाषणात सांगितले की, नक्षलवादामुळे आदिवासी भागांमध्ये अनेक वर्षे विकास पोहोचू शकला नाही. "लाल दहशतीच्या छायेमुळे या भागातील लोक मागे राहिले. मात्र आता परिस्थिती बदलली असून बस्तर विकासाच्या मार्गावर आहे," असे ते म्हणाले. गृहमंत्र्यांनी काँग्रेसवर निशाणा साधत, "७५ वर्षांपैकी ६० वर्षे सत्तेत राहूनही आदिवासी भागांचा विकास का झाला नाही?" असा सवाल उपस्थित केला. त्यांनी आरोप केला की, अनेक वर्षे त्या भागांमध्ये शाळा, आरोग्य सेवा आणि मूलभूत सुविधा पोहोचू दिल्या नाहीत.

शहा यांनी नक्षलवादाची सुरुवात १९७० च्या दशकात झाल्याचे सांगत, त्यामागे विकास नव्हे तर विचारसरणी कारणीभूत असल्याचा दावा केला. "नक्षलवादाची मुळे गरिबीत नाहीत, तर एका विशिष्ट विचारधारेत आहेत," असे ते म्हणाले. नक्षलवादी हिंसाचाराचा निषेध करत त्यांनी सांगितले की, शस्त्र उचलणे हा लोकशाही मार्ग नाही. "संविधान अन्यायाविरुद्ध लढण्याचा मार्ग देते. शस्त्र उचलून निष्पाप लोकांना मारणे कधीच योग्य ठरू शकत नाही," असे शहा यांनी स्पष्ट केले. सरकारच्या विविध योजनांमुळे बस्तर आणि इतर आदिवासी भागांमध्ये शाळा, आरोग्य केंद्रे, शिधावाटप दुकाने आणि आधारसारख्या सुविधा पोहोचल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा झाल्याचा दावा त्यांनी केला.

नक्षलवाद पूर्णपणे संपवण्याची ३१ मार्च २०२६ ही सरकारची घोषित अंतिम मुदत असल्याच्या पार्श्वभूमीवर ही चर्चा महत्त्वाची मानली जात आहे.

## संपादकीय

# इराण-अमेरिका संघर्षाचा भडका आणि जागतिक संकट

ही धमकी दिली आहे, इराणमधील 'तेहरान टाइम्स' या इंग्रजी वृत्तपत्राने. अमेरिकेला इशारा देताना या दैनिकाने म्हटले आहे-'नरकात तुमचे स्वागत आहे. अमेरिकी सैन्य इराणमध्ये घुसले, तर तुमचे सगळे सैनिक शवपेट्यांमध्ये परत जातील.' स्वर्ग वा नरक या कल्पना मानायच्याच तर, युद्धाने अवघ्या मानवी समुदायाला नरकात लोटले आहे। महिना झाला तरी, पश्चिम आशियातील संघर्ष थांबायला तयार नाही. स्वतःला 'शांतिदूत' म्हणवणारे डोनाल्ड ट्रम्प नव्या दमाने इराणला धमकावत आहेत आणि इराणही तेवढ्याच जोरकसपणे प्रत्युत्तर देत आहे. सौदी अरेबियातील लष्करी तळावर इराणने क्षेपणास्त्र हल्ला केला. त्यात अमेरिकेचे पंधरा सैनिक जखमी झाले. तिकडे इस्रायलने इराणवर लढाऊ विमानांच्या साह्याने हल्ला केला. मग इराणने आणखी पाच देशांवर हल्ले चढवले. पहिल्यांदाच येमेनमधून इस्रायलवर क्षेपणास्त्र हल्ला करण्यात आला. काही पत्रकारही या युद्धात मारले गेले. एवढे सगळे सुरू असताना, ट्रम्प मात्र अद्यापही स्वतःला 'शांतिदूत' मानत आहेत. 'गेल्यावर्षी भारत-पाकिस्तानमधील संघर्षासह आठ युद्धे थांबवल्यामुळे माझी ओळख एक महान शांतिदूत म्हणून व्हायला हवी', असे त्यांना वाटते. 'होर्मुझची सामुद्रधुनी सर्वांना पुन्हा खुली करा, या अटीवरच इराणशी कोणताही करार होऊ शकतो. तेल वाहतुकीसाठी हा सागरी मार्ग पुन्हा सुरू होणे आवश्यक आहे', असेही त्यांनी म्हटले आहे. इराणवरील हल्ल्यांचे समर्थन करण्यात ट्रम्प आजही मग्न आहेत. त्यांच्या मते, 'नाटो' हा कागदी वाघ आहे. अमेरिकेने इराणवर हल्ले केले नसते, तर त्या देशाने दोन ते चार आठवड्यांत अण्वस्त्रे तयार केली असती आणि जग असुरक्षित झाले असते. धाकटे जॉर्ज बुश यांनी इराकवर हल्ला चढवताना आणि सद्दाम हुसेनला फासावर चढवताना, अशीच कारणे दिली होती. ती किती धादांत खोटी होती, हे कालांतराने सिद्ध झाले! या युद्धाने जगाला खाईत लोटले आहे. सर्वदूर युद्धाची झळ पोहोचली आहे. 'या संकटाचा मुकाबला भारत खंबीरपणे करेल,' असे पंतप्रधानांनी आश्वस्त केले असले तरी, स्थिती वाटते तेवढी साधी नाही. युद्ध आणखी सुरूच राहिले तर आपल्यावर गंभीर परिणाम होणार आहेत. हा ताण कमी करण्यासाठी आपले पंतप्रधान सौदी अरेबियाशी बोलत आहेत. तिकडे सौदी अरेबिया, इजिप्त आणि तुर्कस्तानचे परराष्ट्रमंत्री पाकिस्तानात पोहोचले आहेत. तणाव कमी करण्याचा प्रयत्न सर्व बाजूंनी सुरू असला तरी अद्यापही त्याला यश येत नाही. इराण लगेच शरण येईल आणि तिथे आपल्याला हवे तसे सत्तांतर सहजपणे होईल, हा ट्रम्प यांचा उद्दाम आत्मविश्वास आता संपला आहे. इराण तेवढ्याच आक्रमकपणे उभा ठाकला आहे. शिवाय, ट्रम्प यांना अपवाद वगळता, कोणाचाही पाठिंबा नाही. खुद्द अमेरिकेत त्यांना विरोध होतो आहे. त्यामुळे आता त्यांची कोंडी झाली आहे. तरीही ते माघार घ्यायला तयार नाहीत. त्यातून संघर्ष धुमसतच चालला आहे. जागतिक अर्थव्यवस्थेवर याचा गंभीर परिणाम होऊ शकतो. पर्यावरणाचे होणारे नुकसान आणखी वेगळेच. अमेरिका आणि इस्रायल या दोघांचा इराण हा समान शत्रू असला तरी इस्रायलला हे युद्ध दीर्घकाळ हवे आहे. अमेरिकेला मात्र एक संदेश देऊन ते संपवून टाकायचे होते. या गोंधळामुळे आता हा संघर्ष कोणाच्याच आवाक्यात नाही. इलॉन मस्कही या रणांगणात उतरल्याची चर्चा आहे. नक्की कोणाच्या हितसंबंधांसाठी युद्धे होतात, हे काही आता गुपित राहिले नाही. त्यात भरडला जातो तो मात्र सामान्य माणूस. युद्धाला महिना होत असताना, सुमारे पन्नास लाख कोटी रुपयांचा चुराडा झाल्याचे अभ्यासक सांगत आहेत. ही आकडेवारी थोडीथोडकी नाही. भारताच्या एका वर्षाच्या अर्थसंकल्पाची रक्कम आहे ही! एवढ्या पैशात पाकिस्तानचा तीन वर्षे उदरनिर्वाह होतो.

## संस्कृत सुभाषित

सुखा अंग देऊ नये । प्रयत्न पुरुष सांडू नये

अर्थ – धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थाची प्राप्ती हवी तर परिश्रम केलेतच पाहिजे.

## गुरु वचन

### यशाच्या गमकासाठी

यश प्राप्त करण्यासाठी नियम, सिद्धातांना प्रत्यक्षात व्यवहार आणण्याची आवश्यकता आहे. मात्र, बऱ्याचशा व्यक्ती नियम आणि व्यवहार यांची सांगड घालताना टाळाटाळ करताना दिसतात. शिक्षण खूप सारी जमीन काबीज करते; पण त्या जमिनीवर कधी शेती करत नाही. दुर्देवाने पुष्कळ व्यक्ती धन संपत्ती खर्च करून शिक्षण घेतात. पण एखादी छोटी–मोठी नोकरी मिळताच आपली योग्यता दाबून ठेवून आहे त्या नोकरीतच हात पाय पसरतात. आपण आपली योग्यता खुंटीला टांगून ठेवतो आणि तकलादू कार्य करण्यात आयुष्य घालवतो. ऑफिसमध्ये टांगण्यात आलेल्या घड्याळयाकडे याकरिता बघितले जाते की अजून घरी जायला किती वेळ बाकी आहे, हे दुर्देवी सत्य आहे. जगातला सर्वात महत्त्वपूर्ण नियम, सिध्दांत तोपर्यंत पूर्ण होऊ शकणार नाही जोपर्यंत आपण त्याचे नाते व्यवहारांशी जोडू शकत नाही.

## सुविचार

या जगातील सर्वात चांगली गोष्ट म्हणजे या जगात गूढपणा आहे, आणि सर्वात वाईट गोष्ट म्हणजे या जगात दु:ख आहे.

– केदार जोशी

## उपदेशकथा



### राग

एका उद्योगपती माणसाने एक लहानशी बाग केली होती व तिच्याभोवती भिंत घालून आत जाण्यास फक्त एकच दार ठेवले होते. ते दार लोखंडी गजाचे असून ते वाटेल तेव्हा खाली सोडता यावे अशी व्यवस्था केली होती. बागेच्या आसपास बरेच लांडगे होते. एके दिवशी एक लांडगा बागेत शिरला असता बागेतील नोकराने त्याला खड्ड्यात पाडून युक्तीने पकडले व झाडाला बांधून ठेवले होते. इतके केल्यावर पुढे काय मजा होते ती पाहण्यासाठी तो थोडावेळ दुसऱ्या झाडाखली जाऊन बसला काही वेळाने तो लांडगा गुरगुरू लागला व त्यामुळे आसपासच्या लांडग्यांचा मोठा कळप येऊन त्या बागेत शिरला. सगळे लांडगे आत आलेत असे पाहताच नोकराने ते लोखंडी दार वरून खाली सोडले. त्याचा आवाज ऐकताच सर्व लांडगे बाहेर पडण्यासाठी दाराजवळ येऊन धडपड करू लागले. परंतु दार अगदी पक्के असल्याने काहीच उपयोग होईना. मग रागाने ते सगळेजण पहिल्या लांडग्याकडे गेले व एका क्षणात त्याला सर्वांनी मिळून मारून टाकले.

कथा उपदेश : आपणास संकटात पाडण्यास कारण झालेला जरी कोणी आपल्या जातीचा असला तरी कोणासही त्याचा राग आल्याशिवाय राहणार नाही.

## पंचांग

| | |
|---|---|
| ३१ मार्च २०२६ | करण:तैतिल ०६:५६:१२ |
| मंगळवार | करण:गर १८:५८:१७ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:मीन |
| चैत्रशके संवत्– १९४७ | चन्द्र:कन्या२१:३२:३० |
| संवत्सर – पराभवनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – शव्वाल |
| मास– चैत्र | तारीख – ११ |
| ऋतु– सौर वसंत | विशेष |
| शुक्ल पक्ष | दमनक चतुर्दशी |
| तिथि:त्रयोदशी ०६:५६:१२ | भगवान महावीर |
| नक्षत्र:पूर्वाफाल्गुनी | जन्म कल्याणक |
| १५:२०:३६ | आसरादेवी यात्रा– दोनद |
| योग:गण्ड १५:४०:५६ | खुर्द (अकोला) |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | | 3 | | | 7 | | 5 |
| 5 | 6 | | | 1 | | 2 | | 9 |
| | | | | | | | 6 | |
| 4 | 3 | | | 2 | | | | 7 |
| 1 | | 8 | 9 | | 4 | 5 | | 6 |
| 6 | | | | 8 | | | 3 | 1 |
| | 8 | | | | | | | |
| 3 | | 7 | | 4 | | | 1 | 2 |
| 9 | | 4 | | | 3 | | 5 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १०२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 2 | 1 | 3 | 6 | 9 | 7 | 4 | 5 |
| 5 | 6 | 3 | 4 | 1 | 7 | 2 | 8 | 9 |
| 7 | 4 | 9 | 8 | 5 | 2 | 1 | 6 | 3 |
| 4 | 3 | 5 | 1 | 2 | 6 | 8 | 9 | 7 |
| 1 | 7 | 8 | 9 | 3 | 4 | 5 | 2 | 6 |
| 6 | 9 | 2 | 7 | 8 | 5 | 4 | 3 | 1 |
| 2 | 8 | 6 | 5 | 9 | 1 | 3 | 7 | 4 |
| 3 | 5 | 7 | 6 | 4 | 8 | 9 | 1 | 2 |
| 9 | 1 | 4 | 2 | 7 | 3 | 6 | 5 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९६१ – अकलीलोव हबटीवोल्ड हे इतोपियाचे प्रथम पंतप्रधान बनले.
- १९८३ – कोलंबियात भुकंपाने ५००० लोक ठार झाले.
- १९८६ – मेक्सीकाना एअरलाईन्स बोईंग ७२७ दुघर्टनाग्रस्त झाल्याने १६७ लोक ठार झाले.
- २००७ – पाकिस्तानने अणू शस्त्र घेऊन जाण्यात सक्षम आणि जमिनीवरुन जमिनीवर मारा करणाऱ्या कमी अंतराचे क्षेपणास्त्र 'अब्दाली' ची यशस्वी चाचणी केली.
- २००७ – जगातील अपंग लोकांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी ८० पेक्षा अधिक देशांनी संयुक्त राष्ट्राच्या एका करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

### राष्ट्रीय

- १९९७ – भारतीय शास्त्रज्ञ डॉ. जयंत विष्णू नारळीकर आणि झेक शास्त्रज्ञ डॉ. निरी ग्रायगर यांना विज्ञान लोकप्रिय करण्याच्या कार्याबद्दल युनेस्कोतर्फे दिला जाणारा कलिंग पुरस्कार प्रदान.
- २००१ – भारतीय फलंदाज सचिन तेंडुलकर याने एकदिवसीय क्रिकेटमध्ये १०,००० धावा पूर्ण केल्या.

### जन्म

- १८४३ – मराठी रंगभूमीचे जनक अण्णासाहेब किर्लोस्कर यांचा जन्म.
- १८६५ – पहिल्या भारतीय महिला–चिकित्सक आनंदीबाई जोशीचे जन्म.
- १९०६ – भारताचे माजी सरसेनापती जनरल के. एस. थिमय्या यांचा जन्म.

### निधन

- १९२६ – प्रसिद्ध इतिहास संशोधक दत्तात्रय बळवंत पारसनीस यांचे निधन.
- १९४५ – जर्मन रसायनशास्त्रज्ञ, नोबेल पुरस्कार विजेते फ्रेड्रिक बर्गिअस यांचे निधन.

## : SMS :

Twin babies were born to sardai's wife that full night Sardar didn't sleep WHY???

he is thinking who is the father of the second baby!!!!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३४.४ | २१.५ |
| अहमदनगर | ३३.८ | १९.९ |
| अकोला | ३८ | २३.२ |
| अमरावती | ३७.४ | २३.१ |
| बीड | ३९ | २६ |
| भंडारा | ३८.४ | २५.५ |
| बुलढाणा | ३१.७ | १९.७ |
| चंद्रपूर | ३८.४ | २७.४ |
| चेन्नई | ४१.९ | २६.९ |
| नवी दिल्ली | ३३.९ | २१.८ |
| धुळे | ३७.२ | २३.२ |
| गोंदिया | ३७.५ | २४.७ |
| जळगाव | ३७.९ | २२.४ |
| कोल्हापूर | ३३.७ | १९.८ |
| लातूर | ३४.९ | २२.६ |
| मुंबई | ३६ | २६.७ |
| नागपूर | ३७.८ | २३.३ |
| नांदेड | ३७.१ | २३.१ |
| नंदूरबार | ३३.५ | २३ |
| नाशिक | ३४.१ | १९.५ |
| पुणे | ३२.७ | १८.२ |
| पंढरपूर | ३६.३ | २१.६ |
| सातारा | ३३.१ | १७.४ |
| सांगली | ३३.९ | २१.३ |
| सोलापूर | ३६.३ | २३.१ |
| वर्धा | ३८.४ | २३.५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील.

**तुळ :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: पश्चिम फायद्याच्या मार्गात विस्तार होईल. ध्येय समोर ठेवून काम केल्यास यश मिळेल.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम अडकलेली कामास गती मिळून ती पूर्ण होतील. जीवनसाथीशी वैचारिक मतभेद होतील.

**वृश्चिक :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पश्चिम मानसिक अस्थिरता बाजूला सारून काम वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा.

**मिथुन :** शुभ रंग :गुलाबी,शुभ दिशा:पूर्व संकोच करू नका, अडचणी येतील. व्यवसायात कर्मचारी त्रास देतील. मुलांची काळजी राहणार नाही.

**धनु :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा :पश्चिम महत्वपूर्ण गोष्टींचा विचार कराल. आळस सोडून देऊन सक्रीय व्हावे लागेल. भेट वस्तू मिळेल.

**कर्क :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पश्चिम व्यवसायीक करार, सहयोग, मार्गदर्शन फायदेशीर राहतील. खरेदी विक्रीच्या व्यवहार होतील.

**मकर :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा :पूर्व जीवनसाथीच्या व्यवहारात सुधारणा होईल. केलेल्या कामाचे चांगले फळ मिळेल.


**सिंह :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पश्चिम नवीन प्रस्ताव आल्यामुळे आपला उत्साह वाढणार आहे. संबंधीत लोकांमध्ये आपली किंमत वाढणार आहे.

**कुंभ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम कार्यकुशलता वाढणार आहे. परिश्रमाचा योग्य मोबदला मिळेल. आर्थिक योजना कार्यान्वयीत होतील.

**कन्या :** शुभ रंग:केसरी,शुभ दिशा: पूर्व मोठ्या लोकांच्या भेटी घेण्याच्या संधी मिळतील. त्याचा फायदा भविष्यात होईल.

**मीन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पूर्व आपला दिलेला सल्ला मानला जाईल. आत्मविश्वास वाढेल. व्यापारात प्रगतीचे योग आहेत.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०३



### आडवे शब्द

१. मुस्लीम शासनकर्ते
३. सोमवारची अमावस्या
६. नंतर
८. नेहमी
११. मुमताज बेगमची कबर
१३. थांबून थांबून केलेला प्रवास
१६. नम्र वाकलेला
१८. एक नदी
२०. फणसाचा एक प्रकार
२१. घ्राणेंद्रिय
२२. उष्ण
२५. मत देणारा
२६. कलंक
२७. एक कडू फळ, हिदीत कूस
२८. पेन ठेवण्याची पेटी
२९. मोठी बहीण
३०. मज्जाव
३१. खासगी
३४. वरपांगी
३७. हाताचा तळवा
४१. श्रीकृष्णाचे एक नाव
४४. फिकीर, काळजी
४५. उष्णतेने पायाला भेगा पडण्याचा रोग
४६. सोन्याचा धागा
४७. बेडर
४८. तोंडी करार
५०. जल
५१. सोन्या–चांदीचा व्यापारी
५२. महिला, स्त्री
५३. मृत्यू, वेळ
५१. बाण
५६. पटल
५७. कोवळ्या दुधाचा पदार्थ
५८. देखत, समोर
६०. रविवार
६३. कापणे
६४. खिन्न, कष्टी, निरपेक्ष
६६. चिता
६७. मोठी नदी
६९. भिस्त
७०. वेळेवर हजर असणाऱ्याला मिळणारे पद
७१. किराणा व्यापारी
७२. धपाटा
७३. चांदण्याचा ऋतू
७४. करवंद
७५. स्नान न केलेला
७६. नाविक दल
७७. लावलेला पिंजरा
८०. पोळ्या भाजण्याचे साधन
८१. लाख
८२. झकास, सुंदर
८३. डोळ्यावरील उघडझापीचा अवयव

### उभे शब्द

१. रानावनात वाढलेला गोष्टीतील मुलगा
२. वेल
३. चंद्र
४. मोठा, प्रचंड
५. वर्तुळ
६. मला
७. जहाज
८. 'नटसम्राटाची' पत्नी
९. किंमत
१०. नीच
१२. कोळिष्टकावरील कचरा
१३. मज्जाव
१४. किंमत
१५. संत नामदेवांची शिष्य
१७. शहर
१९. हटकून
२३. बारीक झणझण
२४. उगीच
२५. मनाचा आधीन असलेला
२६. सुताराचे हत्यार
२९. ताठ स्वभावाचा
३२. जेव्हा
३३. किरकोळ सामान
३५. रमापती
३६. मांडणी, सजावट करणारा
३८. चंद्र
३९. बूड
४०. मध्यस्थ
४२. गणक, मोजणी करणारा
४३. प्रत्येक, मूल्य
४७. 'ह्मी वंदिले, धारातीर्थी तप ते आचरिती'
४९. सततची हालचाल
५०. झाडावर पिकू लागलेले फळ
५१. सुकुमार
५२. बारसे
५५. रसाळ
५६. पंधरवडा, बाजू
५७. खोदकाम
५९. चामखीळ
६१. विसराळू
६२. उत्सवाचे, सणाचे दिवस
६४. सोडवून दाखविलेले गणित, नमुना
६५. दुर्दशा
६८. प्रत्येक वर्षी
७३. लाज
७५. बासरी
७८. अर्धी ओंजळ
७९. राजपत्नी

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. १०२ चे उत्तर

आडवे उत्तर : १.राजकाज ४.तोच चारा ७.पान ९.कासव १२.गरम १४.राहू १५.मनकवडा १८.रसा १९.तातडी २१.बाकदार २२.लसलस २४.फार २५.रस २७.समर २९.वरीस ३२.लखलाभ ३५.माकड ३७.तड ३८.कथेकरी ४१.लाजलावणा ४४.तट ४५.सवड ४७.चार ४८.बालवाडी ५१.कणखर ५३.पर ५४.रत ५५.नजरानजर ५७.शारदा ५८.वंदन ६०.वानवा ६३.सजावट ६५.उदर ६६.सावन ६७.नम्रता ६८.तर ६९.दमा ७१.वखार ७३.रजनीनाथ ७४.सेना ७६.समरस ७८.पड ८०.नायक ८२.खग ८३.दादर ८४.सटरफटर ८६.नाल ८७.सरकार ८८.वातड ८९.टर ९०.वाटप

उभे उत्तर : १.राग २.जरतारी ३.कामत ४.तोरा ५.चहुबाजूला ६.रामदास ७.पाक ८.नवल १०.सरसरीत ११.वसा १४.रज १६.नरम १७.डास २०.डीर २३.लव २४.हरकत २६.सल २८.रमावर ३०.सडसडीत ३१.पोक ३३.खप्पड ३४.भलावण ३६.कणा ३९.थेट ४०.रीस ४२.लाचार ४३.साल ४६.वदन ४८.बारदान ४९.वारस ५०.सांज ५१.करवंद ५२.खनन ५३.परवानगी ५५.नवजात ५६.राकट ५९.दररोज ६१.वानरसेना ६२.सतार ६४.वरवर ६५.उमा ६६.सामनावीर ६९.दर ७०.खसखस ७२.खासदार ७३.रड ७५.नायनाट ७७.मगर ७८.परवा ७९.खेटर ८१.कलप ८४.सड ८५.फट

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### भगवान महावीर स्वामींच्या 2625व्या जन्मकल्याणकानिमित्त भव्य उत्सव



■ रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त दिवसभर दर्शन; सायंकाळी महाआरती व दिमाखदार वरघोडा

पुणे (दैनिक संध्या) : पुण्यातील तुळशीबाग–मंडई परिसर जैन संघाच्या वतीने भगवान महावीर स्वामींच्या २६२५व्या जन्मकल्याणकानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा प्रभूंच्या दर्शनी मूर्तीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याने उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या निमित्ताने भगवान महावीर स्वामींची आकर्षक व दर्शनीय मूर्ती तयार करून ती दिवसभर मंडई परिसरात दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. जैन समाजाबरोबरच इतर नागरिकांनाही प्रभूंचे दर्शन घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. सायंकाळी प्रभूंची भव्य महाआरती आयोजित करण्यात येणार असून "कौन बनेगा भाग्यशाली" या लकी ड्रॉचेही आयोजन करण्यात आले आहे. तसेच लक्ष्मी रोडवरून दिमाखदार वरघोडा काढण्यात येणार असून, मागील २५ वर्षांपासून पुणे सकल संघाच्या वरघोड्यात या मंडळाचा बक्षीसपात्र सहभाग राहिला आहे. उत्सवाबाबत माहिती देताना मोहन साखरिया यांनी सांगितले की, तुळशीबाग–मंडई परिसर जैन संघाच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून प्रभूंच्या दर्शनी मूर्तीला यंदा २५ वर्षे पूर्ण होत आहेत. हा उत्सव जैन समाजाच्या श्रद्धा आणि एकात्मतेचे प्रतीक असून अधिकाधिक भक्तांनी उपस्थित राहून दर्शन, आरती व वरघोड्यात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

### रामनामाच्या गजरात भक्तीमय वातावरणात श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा



■ श्रीराम सेवा समितीचा प्रेरणादायी उपक्रम; भजन, पूजन आणि महाप्रसादाचा भाविकांना लाभ

पुणे (दैनिक संध्या) : मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम यांच्या पावन जन्मोत्सवानिमित्त श्रीराम सेवा समितीच्या वतीने पुण्यात अत्यंत भक्तीमय, आध्यात्मिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात श्रीराम जन्मोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. 'श्रीराम जय राम जय जय राम' या अखंड नामस्मरणाने परिसर दुमदुमून गेला होता. रामभक्तीच्या या दिव्य सोहळ्यात शेकडो भाविकांनी उपस्थित राहून भक्तिरसाचा आनंद लुटला. अल्पबचत भवन येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात वैदिक मंत्रोच्चार आणि पारंपरिक विधींनी करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते प्रभू श्रीरामांचे विधिवत पूजन करण्यात आले. ईश्वरचंद गोयल, जयभगवान गोयल, पवन बंसल, पवन चमडिया, गुंजन नवाल, नरेंद्र गोयल, प्रेम मित्तल, सतीश अग्रवाल, योगेश जैन, पवन सराफ, आनंद अग्रवाल, राकेश अग्रवाल, रितेश अग्रवाल, गीता गोयल, रुची गोयल, राजेश मित्तल, सुनीता बंसल, नंदलाल पूरनचंद , द्वारका जालन यांच्यासह पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर हरियाणातील सुप्रसिद्ध भक्तीगीत गायिका प्रियंका चौधरी आणि गायक अरविंद अग्रवाल यांनी सादर केलेल्या सुमधुर भजनांनी संपूर्ण वातावरण भक्तीरसाने ओथंबून गेले. त्यांच्या स्वरातून साकारलेल्या श्रीरामाच्या गुणगायनाने उपस्थित भाविकांना आत्मिक शांतीचा अनुभव दिला. 'लोगो का हमें काम है करना, उनको ऊंचा उठाना है' या संदेशपूर्ण भजनातून त्यांनी भक्तीबरोबरच समाजसेवेचे महत्त्वही अधोरेखित केले. या कार्यक्रमात श्रीरामांचे परमभक्त बजरंगबली हनुमान यांचे प्रभावी सादरीकरण विशेष आकर्षण ठरले. हनुमानाच्या वेशभूषेत रंगमंचावर अवतरलेल्या कलाकाराने उपस्थितांमध्ये ऊर्जा, उत्साह आणि भक्तिभाव जागवला. तसेच राधा-कृष्णाच्या पवित्र प्रेमभावनेवर आधारित सादरीकरण आणि गीते चतुर्वेदी यांनी सादर केलेल्या भावस्पर्शी गीतांनी उपस्थितांना अंतर्मुख केले.

### विजेचा धक्का बसून शेतकऱ्याचा मृत्यू

मंचर (दैनिक संध्या) : शेतातील ऊस पिकाला पाणी भरण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याचा विजेचा धक्का बसून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. सुरेश पांडुरंग थोरात (वय 44) असे मृत शेतकऱ्याचे नाव असून ही घटना चांडोली बुद्रुक (ता. आंबेगाव) येथे सकाळी साडेसात वाजता घडली. चांडोली गावातील सुरेश पांडुरंग थोरात यांची घराच्या बाजूला शेती असून तिच्यामध्ये उसाचे पीक घेतले आहे. थोरात सकाळी सात वाजता विज आल्यानंतर ऊसालापाणी भरण्यासाठी शेतात गेले होते. वीज पंप सुरू करून पाणी शेतात आल्यानंतर ते उसाला पाणी देऊ लागले. या शेतात एक वीज वाहक लोखंडी खांब आहे. काही दिवसांपूर्वी या खांबाला वाहन धडकल्याने तो आडवा झाला होता. मागणी करूनही वीज मंडळाने या खांबाची दुरुस्ती केली नव्हती. सदर खांबावरील केबल कट होऊन त्यातून वीज प्रवाह लोखंडी खांबाच्या अर्थिंग वायरमधून आला होता. सदरच्या खांबाजवळ पाणी भरत असताना थोरात यांचा स्पर्श खांबाला झाला आणि त्यांना विजेचा जबर धक्का बसून ते जागेवर कोसळले. बराच वेळ ते खांबाला चिकटलेल्या अवस्थेत होते. सकाळच्या वेळी गावातील ज्येष्ठ नागरिक वामन तुळशीराम थोरात हे मॉर्निंग वॉकसाठी तेथे आले असता त्यांना सदरचा प्रकार दिसला. वामन थोरात यांनी मदतीसाठी आरडाओरडा केल्यानंतर परिसरातील नागरिक जमा झाले. त्यांनी सुरेश थोरात यांना उपचारासाठी तातडीने मंचर येथील एका खासगी दवाखान्यात आणले. तेथील डॉक्टरांनी त्यांना मंचर उपजिल्हा रुग्णालयात नेण्याचा सल्ला दिला.

# जडाबाई दुगड शिक्षण संकुल येथे संगणक कक्ष आणि ग्रंथालयाचे उद्‌घाटन




पुणे (दै. संध्या) :

पुण्यातील सुखसागर परिसरात गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी उभारण्यात आलेल्या जडाबाई दुगड शिक्षण संकुल येथे संगणक कक्ष आणि ग्रंथालयाचे उद्‌घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. लेडीज सर्कल इंडिया यांच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती शीशम सबरवाल आणि क्षेत्र अध्यक्षा श्रीमती मेघा राठी यांच्या हस्ते या अत्याधुनिक लॅबचे उद्‌घाटन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून गौरव दुगड आणि मोनल दुगड उपस्थित होते. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका नंदा राजाराम भोसले, पुणे कॉस्मोपोलिटन राऊंड टेबल 110 चे अध्यक्ष अश्विन संघवी, पुणे कॉस्मोपोलिटन लेडीज सर्कल 81 च्या अध्यक्षा सुमन पोरवाल, सचिव वीनीता खाटर, कोषाध्यक्ष विनिता ओसवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना संस्थेच्या सचिव मोनल दुगड यांनी सांगितले की, "सुमारे 40 वर्षांपूर्वी गोरगरीब मुलांसाठी सुरू केलेली ही शाळा आज मोठ्या प्रमाणात विकसित झाली आहे. येथे सेमी-इंग्लिश माध्यम सुरू करण्यात आले असून कमी शुल्कात दर्जेदार शिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आता लायब्ररी आणि संगणक लॅबची भर घालण्यात आली आहे."

ही संस्था कै माणिकचंद नारायणदास दुगड यांनी सुरू केली असून सध्या प्रमोद माणिकचंद दुगड हे चेअरमन म्हणून कार्यरत आहेत. तर गौरव दुगड उपाध्यक्ष आणि मोनल दुगड सचिव पदावर कार्यरत आहेत. संस्थेच्या माध्यमातून सुखसागर परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत.

या प्रसंगी शीशम सभरवाल यांनी या संयुक्त प्रयत्नांचे कौतुक केले आणि मानवी जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. तंत्रज्ञान आणि पुस्तकांची उपलब्धता कशा प्रकारे संधींमधील तफावत भरून काढू शकते आणि विद्यार्थ्यांसाठी एक उज्ज्वल भविष्य घडवू शकते, यावर त्यांनी प्रकाश टाकला. नव्याने उभारण्यात आलेला संगणक कक्ष मुलांना आवश्यक डिजिटल कौशल्ये विकसित करण्यास मदत करेल, तर ग्रंथालय संस्थेतील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय आणि आजीवन शिकण्याची वृत्ती जोपासण्यास हातभार लावेल अशी अपेक्षा आहे.

दीर्घकालीन सकारात्मक प्रभाव निर्माण करणाऱ्या सामाजिक कार्यांमध्ये योगदान देताना दोन्ही संस्थांच्या सदस्यांनी आपला अभिमान व्यक्त केला. खऱ्या अर्थाने सक्षमीकरण हे केवळ शिक्षणच नव्हे, तर स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून दिल्यानेच साध्य होते, या आपल्या विश्वासाचा त्यांनी पुनरुच्चार केला. या उपक्रमासाठी पुणे कॉस्मोपोलिटन राऊंड टेबल 110 आणि पुणे कॉस्मोपोलिटन लेडीज सर्कल 81 यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच मोहित गलानी, भावना गलानी, पूर्वा संघवी, प्रीती कटारिया आदी मान्यवरांचीही उपस्थिती होती.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक विस्तारीकरणाला गती

*जागा हस्तांतरणासाठी प्रयत्न; तांत्रिक प्रक्रिया लवकर पूर्ण होणार*

पुणे (दै. संध्या) :

मंगळवार पेठेतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाच्या विस्तारीकरणाचा प्रश्न लवकर सोडवण्यासाठी महापालिका प्रशासन सक्रिय झाले आहे. राज्य सरकारच्या रस्ते विकास महामंडळाच्या मालकीची जागा पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरित करून त्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिष्ठेला साजेसं भव्य स्मारक उभारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, अशी माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. रिपब्लिकन पक्षाचे नेते व पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आयुक्तांची भेट घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा केली. यावेळी बाळासाहेब जानराव, राहुल डंबाळे, महिपाल वाघमारे, उमेश कांबळे, जयदेव रंधवे आदी पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत राज्य सरकारकडून स्मारकाबाबत सकारात्मक विचार सुरू असल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे स्मारक उभारणीच्या प्रक्रियेत कोणतीही अडचण येणार नाही, असा विश्वास आयुक्तांनी व्यक्त केला. तसेच आवश्यक तांत्रिक बाबींची पूर्तता शक्य तितक्या लवकर करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, चर्चेनंतर शिष्टमंडळाने समाधान व्यक्त करत, गरज भासल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व संबंधित अधिकाऱ्यांची पुन्हा भेट घेऊन पुढील पाठपुरावा केला जाईल, असे स्पष्ट केले. यावेळी पदाधिकाऱ्यांनी ठाम भूमिका मांडत सांगितले की, मंगळवार पेठ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारण्यासाठीचा लढा कोणत्याही परिस्थितीत सुरूच राहणार आहे. हा लढा पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन व्यापक सामाजिक चळवळ म्हणून पुढे नेण्याचा आमचा प्रयत्न आहे. राजकीय हेवेदावे आणि आरोप-प्रत्यारोप दुर्दैवी असून, स्मारक उभारणी हाच आमचा एकमेव उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.

## मॉन्ट्रा इलेक्ट्रिकचा महाराष्ट्रात विस्तार; डीलरशिपचे अनावरण




पुणे (दै. संध्या) :

वैविध्यपूर्ण मुरुगप्पा समूहाची क्लीन मोबिलिटी शाखा असलेल्या मॉन्ट्रा इलेक्ट्रिकने पुण्यात आपल्या पहिल्या इलेक्ट्रिक ट्रॅक्टर (ई-२७) डीलरशिपच्या उद्‌घाटनाने प्रवेश केला आहे. जागतिक भू-राजकीय परिस्थितीमुळे पारंपरिक इंधन पुरवठा साखळी आणि किंमतींबाबत अनिश्चितता निर्माण होत असताना हे पाऊल उचलण्यात आले आहे. कृषी क्षेत्रासाठी डिझेल हा मुख्य घटक राहिला आहे. त्यामुळे मॉन्ट्रा इलेक्ट्रिकचा ई-२७ हे एक शाश्वत आणि व्यवहार्य पर्याय म्हणून काम करतो. तो खर्चावर नियंत्रण देऊन इंधनावर अवलंबून राहण्याचे प्रमाण कमी करू शकतो. कृषी आणि औद्योगिक अशा एकत्रित मागणीमुळे तो पुणे प्रदेश बाजारपेठेत एक महत्त्वपूर्ण संधी सादर करणार आहे. बारामती, इंदापूर, जुन्नर आणि शिरूर अशा कृषीवर आधारित क्षेत्रांमध्ये शेती, मालवाहतूक आणि संबंधित कामांमध्ये वापरल्या जाणाऱ्या ट्रॅक्टरची स्थिर मागणी निर्माण होते. त्याचवेळी चाकण, पिंपरी-चिंचवड, वाघोली आणि पुणे शहरसारखी वेगाने विकसित होत असलेली औद्योगिक केंद्रे बांधकाम, रसद आणि पायाभूत सुविधांच्या कामासाठी ट्रॅक्टरचा वापर करतात. ग्रामीण उत्पादकता आणि शहरी-औद्योगिक वाढीचे हे संयोजन संपूर्ण प्रदेशातील ट्रॅक्टरसाठी शाश्वत आणि वैविध्यपूर्ण मागणी परिसंस्था तयार करते.

## द्विध्रुवीय मन समजून घेण्याची गरज: मीना राजपूत

पुणे (दै. संध्या) :

बायपोलर मूड डिसॉर्डर हा केवळ साधा मूड स्विंग नसून, मेंदूशी संबंधित वैद्यकीय आजार आहे. योग्य उपचार आणि कुटुंबाचा आधार मिळाल्यास या आजारावर नियंत्रण मिळवून व्यक्ती यशस्वी आणि संतुलित आयुष्य जगू शकते. त्यामुळे द्विध्रुवीय मन समजून घेण्याची गरज आहे, असे मत समतोल बायपोलर मूड डिसऑर्डर आधार गटाच्या समन्वयक मीना वीरेन राजपूत यांनी व्यक्त केले. जागतिक बायपोलर दिनानिमित्त त्यांनी त्यांच्या पती विरेन यांच्या अनुभवातून या आजाराचे वास्तव मांडले. विरेन हे यशस्वी आणि कर्तृत्ववान व्यावसायिक असले,



तरी त्यांच्या आयुष्यात मन:स्थितीचे टोकाचे बदल होत असत. 'मॅनिया'च्या अवस्थेत त्यांच्यात प्रचंड ऊर्जा निर्माण होऊन ते सलग अनेक तास न झोपता काम करत, वेगाने बोलत आणि जोखमीचे निर्णय घेत असत. मात्र काही काळानंतर 'डिप्रेशन'च्या टप्प्यात ते पूर्णपणे खचून जात, अंथरुणातून उठण्याची इच्छाही होत नसे आणि नकारात्मक विचारांनी ग्रासले जात, असे त्यांनी सांगितले.

## पाषाण–बाणेर लिंक रोडवरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी उपाययोजना करा

*सुरू होणाऱ्या पासपोर्ट सेवा केंद्राच्या पार्श्वभूमीवर सनी निम्हण यांची मागणी*

पुणे (दै. संध्या) :

पाषाण–बाणेर लिंक रोड येथे सोमवारपासून सुरू होणाऱ्या पासपोर्ट सेवा केंद्राच्या पार्श्वभूमीवर परिसरातील वाहतूक व सार्वजनिक व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वाढत्या गर्दीमुळे संभाव्य वाहतूक कोंडी, अतिक्रमण आणि सुरक्षेच्या मुद्द्यांवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नगरसेवक सनी विनायक निम्हण यांनी केली आहे. निम्हण यांनी पुणे महानगरपालिका आणि वाहतूक विभागाकडे सादर केलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, पासपोर्ट सेवा केंद्र सुरू झाल्यानंतर दररोज मोठ्या संख्येने नागरिकांची ये-जा होणार आहे. त्यामुळे रिक्षा, कॅब आणि खाजगी वाहनांची वाढती



वर्दळ लक्षात घेता या मार्गावर सतत ट्रॅफिक जॅम होण्याची शक्यता आहे.

तसेच, परिसरात अनधिकृत फेरीवाले, खाद्यपदार्थ विक्रेते आणि झेरॉक्स दुकाने उभारली गेल्यास अतिक्रमण वाढून रस्ते अरुंद होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. पार्किंगसाठी स्वतंत्र व्यवस्था नसल्यास नागरिकांची वाहने रस्त्यावरच उभी राहून वाहतुकीचा वेग मंदावू शकतो, अशीही चिंता त्यांनी व्यक्त केली आहे. मोठ्या प्रमाणावर नागरिकांची उपस्थिती लक्षात घेता सुरक्षा आणि शिस्त राखण्यासाठी पोलिस बंदोबस्त आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने पूर्वनियोजन करून वाहतूक नियंत्रणाची प्रभावी अंमलबजावणी करावी, नो-पार्किंग झोन आणि ड्रॉप-ऑफ पॉईंट निश्चित करावेत, स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था उभारावी, तसेच अनधिकृत फेरीवाल्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, आवश्यक त्या ठिकाणी वाहतूक पोलीस आणि स्वयंसेवकांची नियुक्ती करावी, अशीही सूचना करण्यात आली आहे. महापालिका, वाहतूक पोलीस आणि संबंधित विभागांची संयुक्त बैठक तातडीने आयोजित करून समन्वयाने नियोजन केल्यास नागरिकांना सुलभ सेवा मिळेल आणि परिसरात शिस्त राखता येईल, असा विश्वास निम्हण यांनी व्यक्त केला आहे.

# अपोलो हॉस्पिटल्सच्या एअर ॲम्ब्युलन्स सेवेचे आधुनिकीकरण

■ अधिक सक्षम सेवेमुळे देश-विदेशातील रुग्णांना मिळणार वेगवान उपचार

■ अनेक एअर ॲम्ब्युलन्स ऑपरेटरसोबत सामंजस्य करार: रुग्णांची ने-आण अधिक सुलभ करण्यासाठी, उत्तम समन्वय राखण्यासाठी आणि हस्तांतरणाचा खर्च कमी करण्यासाठी विविध एअर ॲम्ब्युलन्स सेवा पुरवठादारांशी करार करण्यात आले आहेत.

■ १०६६ EMS - एकच संपर्क केंद्र: सहयोगी कंपन्यांच्या मदतीने पुरवल्या जाणाऱ्या सर्व एअर ॲम्ब्युलन्स सेवांसाठी '१०६६ EMS' हे एकमेव समन्वयाचे केंद्र (Single Access Point) म्हणून काम करेल

पुणे (दै. संध्या) :

अपोलो हॉस्पिटल्सने 'रुग्ण वाहतूक सुविधेबाबत' एक विशेष उपक्रम सुरु करत असल्याची घोषणा आज केली आहे. भारत



आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध भागीदारांसोबत समन्वय साधून हवाई वैद्यकीय वाहतुकीद्वारे गंभीर स्थितीतील रुग्णांना प्रगत आरोग्य सेवा तातडीने उपलब्ध करून दिल्या जाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. गेल्या काही महिन्यांत, अपोलो हॉस्पिटल्सने अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय एअर ॲम्ब्युलन्स कंपन्यांसोबत करार केले आहेत. यामुळे तातडीच्या उपचारांची गरज असलेल्या रुग्णांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे आता अधिक सोपे आणि सुरक्षित होईल. ही सर्व सेवा अपोलोच्या '१०६६ इमर्जन्सी रिस्पॉन्स नेटवर्क' द्वारे चालवली जाईल. या अंतर्गत सर्व सेवा पुरवठादारांना एकत्र आणून रुग्णांची वाहतूक वेगाने आणि सुव्यवस्थित पद्धतीने करणे शक्य होईल. अपोलो हॉस्पिटल्सच्या या नवीन भागीदारीमुळे आपत्कालीन वैद्यकीय प्रवासात येणाऱ्या अडचणी दूर होणार आहेत. दुर्गम किंवा लांबच्या ठिकाणाहून रुग्णांना आणताना होणारा विलंब, जास्त खर्च आणि मध्यस्थांची गरज आता कमी होईल. या नव्या उपक्रमामुळे रुग्णांची हवाई वाहतूक सेवा रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबासाठी अधिक सुलभ आणि विश्वासार्ह होणार आहे.

एअर ॲम्ब्युलन्स सेवा आता अधिक प्रगत आणि अधिक विस्तृत केल्याबाबत, अपोलो हॉस्पिटल्सच्या उपाध्यक्ष डॉ. प्रीता रेड्डी म्हणाल्या: "गंभीर परिस्थितीतील रुग्णाला, योग्य वेळी योग्य रुग्णालयात पोहोचवणे हे जीव वाचवण्यासाठी अत्यंत मोलाचे ठरते. नामवंत एअर ॲम्ब्युलन्स पुरवठादारांशी केलेल्या हातमिळवणीमुळे, आता रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबांना प्रगत उपचार मिळवणे अधिक सोपे झाले आहे. ही सेवा केवळ शहरांपुरती मर्यादित नसून आंतरराष्ट्रीय स्तरावरही अधिक पारदर्शक आणि सुव्यवस्थित पद्धतीने उपलब्ध असेल. आमच्या '१०६६' रिस्पॉन्स नेटवर्कच्या मदतीने रुग्णांना उपचारांचे उत्तम नियोजन आणि रुग्णालयाची पूर्वतयारी अशा दोन्ही सुविधा मिळतील. यामुळे रुग्णांना हव्या त्या वेळी आवश्यक उपचार मिळण्यासाठी एक सुरक्षित आणि खात्रीशीर मार्ग तयार झाला आहे." पहिल्या टप्प्यात, अपोलो हॉस्पिटल्सने देश-विदेशातील रुग्णांच्या वाहतुकीसाठी अनेक एअर ॲम्ब्युलन्स सेवा पुरवठादारांशी करार केले आहेत. यामध्ये ब्ल्युडॉट चार्टर्स अँड एअर ॲम्ब्युलन्स सर्व्हिसेस (युएई), एरोमेड इंटरनॅशनल रेस्क्यू सर्व्हिसेस प्रा. लि., झंकार एव्हिएशन प्रा. लि., iCATT हेल्थ सोल्युशन्स प्रा. लि., एअर रेस्क्युअर्स वर्ल्ड वाइड प्रा. लि., वेदांत एअर रेस्क्यू प्रा. लि., एरोकेअर एअर ॲम्ब्युलन्स सर्व्हिस, आयुसेवा एअर अँड ट्रेन ॲम्ब्युलन्स, एअर मेडिकल 24X7 प्रा. लि. आणि फ्लॅप्स एव्हिएशन प्रायव्हेट लिमिटेड यांचा समावेश आहे. गंभीर स्थितीतील रुग्णाला तातडीने प्रगत उपचार केंद्रांमध्ये हलवणे आवश्यक असते, अशा वेळी सहयोगी कंपन्यांसोबत समन्वय साधून हवाई रुग्णवाहिका सेवा सहज उपलब्ध करून देणे, हा या भागीदारीचा मुख्य उद्देश आहे.

अपोलो हॉस्पिटल्सच्या इमर्जन्सी विभागाचे क्लिनिकल डायरेक्टर डॉ. धवपलानी अलागप्पन म्हणाले: "एअर ॲम्ब्युलन्समध्ये लाइफ-सपोर्ट सिस्टम, व्हेंटिलेटर, डिफिब्रिलेटर आणि इतर प्रगत वैद्यकीय उपकरणे उपलब्ध असतात. यामुळे अतिशय गंभीर रुग्णांना प्रवासादरम्यानही 'आयसीयू' सारख्याच सखोल देखभालीचा आधार मिळतो. संपूर्ण प्रवासात, प्रशिक्षित वैद्यकीय पथक आणि प्रमाणित डॉक्टरांद्वारे रुग्णांचे सतत निरीक्षण केले जाते. हे डॉक्टर रुग्णांना औषधे देऊ शकतात आणि त्यांना स्थिर ठेवण्यासाठी, आराम मिळवून देण्यासाठी आवश्यक ते उपचारही करू शकतात. क्रिटिकल केअर युनिटमध्ये मिळणारे वैद्यकीय उपचार प्रवासादरम्यानही कायम मिळत राहणे अत्यंत आवश्यक असते आणि ते मिळवून देण्यासाठी आम्ही सक्षम आहोत."

अपोलो हॉस्पिटल्सच्या हेल्थकेअर लॉजिस्टिक्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रामकृष्ण विजय वर्मा म्हणाले: "अपोलोच्या '१०६६' या आपत्कालीन हेल्पलाइनवर विनंती आली की, तातडीने आमचे इमर्जन्सी रिस्पॉन्स पथक रुग्णाच्या प्रकृतीचा आढावा घेते. त्यानंतर प्रवासासाठी सर्वात योग्य मार्ग निश्चित केला जातो आणि आमच्या सहयोगी एअर ऑपरेटरच्या मदतीने वाहतुकीचे नियोजन केले जाते. विमान वाहतुकीशी संबंधित सर्व तांत्रिक बाबींचे (लॉजिस्टिक्स) व्यवस्थापन एअर ॲम्ब्युलन्स ऑपरेटरद्वारे केले जाते. या सेवेचा दर आधीच निश्चित असल्याने आणि यामध्ये मध्यस्थांना कोणताही वाव नसल्यामुळे, अलीकडे या सेवेचा लाभ घेणाऱ्या रुग्णांची मोठी आर्थिक बचत झाली आहे."

हा उपक्रम अपोलोच्या सध्याच्या आपत्कालीन पायाभूत सुविधांना देशभरातील '१०६६' नेटवर्कशी जोडतो. यामध्ये अपोलोची आपत्कालीन समन्वय क्षमता, जमिनीवरील रुग्णवाहिका सेवा, विमानतळ ते रुग्णालय कनेक्टिव्हिटी आणि भागीदारांमार्फत चालवली जाणारी हवाई वाहतूक यांचा समावेश आहे. यामुळे रुग्णांना एका बेडवरून दुसऱ्या बेडपर्यंत पोहोचवण्यासाठी संपूर्ण सहकार्य मिळेल आणि प्रतिसादाची कार्यक्षमता सुधारेल. परिणामी, दुर्गम भाग, टियर-२ आणि टियर-३ शहरे तसेच आंतरराष्ट्रीय ठिकाणांहून येणाऱ्या रुग्णांना कोणत्याही अडथळ्याशिवाय प्रगत उपचार मिळणे शक्य होईल.

हा उपक्रम सुरु करून, अपोलो हॉस्पिटल्स आपली आपत्कालीन रुग्ण वाहतूक सेवा आणि रुग्णांना मिळणारे उपचार अधिक सुलभ करण्यावर अधिक भर देत आहे. प्रगत उपचारांसाठी वेळेला खूप जास्त महत्त्व असते. त्यामुळे शहरांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय वैद्यकीय वाहतुकीसाठी अपोलोने एक अधिक संघटित, सुव्यवस्थित, सक्षम चौकट तयार केली आहे.

# माओवादाविरुद्ध लढा दिलेल्या सी-60 जवानांना 'सी-60 पदक' देण्यात येणार

मुंबई (दै. संध्या) :



माओवादाविरोधातील लढ्यात महाराष्ट्र पोलिसांनी निर्णायक यश मिळविले आहे. आता माओवादाची चळवळ राज्यात नगण्य पातळीवर आली आहे. त्यामुळे किमान तीन वर्षे सी-60 मध्ये सेवा बजावणाऱ्या जवानांना राज्य शासनामार्फत विशेष 'सी-60 पदक' देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पोलीस महासंचालक कार्यालयात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची अर्धवार्षिक परिषद झाली. या परिषदेस गृह राज्यमंत्री (ग्रामीण) पंकज भोयर, गृह राज्यमंत्री (शहरे) योगेश कदम, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते तसेच भारतीय पोलिस प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते. गडचिरोलीसारख्या भागात आता विकासाचे नवे चित्र उभे राहत असून लोकशाहीची मुळे बळकट होत असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माओवादाची चळवळ राज्यात नगण्य पातळीवर आली असून आता तिच्या पुनरुज्जीवनाला आळा घालणे हे पुढील मोठे आव्हान आहे. या संघर्षात 244 पोलीस कर्मचारी शहीद झाले, तर 609 नागरिकांनी प्राण गमावले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलीस यंत्रणेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर देत, गुन्हे अन्वेषण आणि न्यायप्रक्रियेत 'एंड टू एंड' डिजिटायझेशन आवश्यक असल्याचे सांगितले. विविध अन्वेषण आणि क्राईम मॉडेल्सचा समन्वय साधून संपूर्ण क्रिमिनल जस्टिस सिस्टीम डिजिटल करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. डिटेक्शनपासून एव्हिडन्स संकलन, चार्जशीट दाखल करणे यांसह सर्व प्रक्रिया शंभर टक्के डिजिटल झाल्यास पुराव्यांची अचूकता आणि साखळी अधिक मजबूत होईल, असे त्यांनी सांगितले. तसेच, नवी मुंबईत राबविण्यात आलेल्या ब्लॉकचेन-आधारित एव्हिडन्स मॅनेजमेंट सिस्टीमप्रमाणे प्रणाली राज्यभर लागू केल्यास पुराव्यातील छेडछाड रोखता येईल, असा सांगून पुढील सहा महिन्यांत सर्व पोलीस ठाण्यांमध्ये ही प्रणाली लागू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

दोषारोप सिद्ध होण्याचे प्रमाण (कन्व्हिक्शन रेट) वाढवण्यास अपयशी ठरलेल्या प्रकरणांचे विश्लेषण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'सीआयडी'ला दिले. राज्यातील गंभीर गुन्ह्यांमध्ये दोषारोप दर वाढवण्यासाठी ठोस कार्यपद्धती (एसओपी) आणि स्पष्ट रोडमॅप तयार करावा असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्याचबरोबर पोलीस आणि सरकारी वकिलांच्या कामगिरीचे स्वतंत्र मूल्यमापन करणारा डॅशबोर्ड विकसित करण्यावर त्यांनी भर दिला.रस्ते अपघातांबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले नागपूर आणि मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील प्रयोगांमुळे अपघातात घट झाली आहे. त्यामुळे योग्य तंत्रज्ञान आणि रणनीती वापरून मृत्यूदर कमी करण्यावर भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सायबर सुरक्षेबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मशी अधिक प्रभावी समन्वयाची गरज व्यक्त केली. आक्षेपार्ह किंवा धोकादायक मजकूर हटवण्यासाठी विलंब टाळण्यासाठी ठोस यंत्रणा उभारण्याचे निर्देश त्यांनी दिले. सायबर स्पेसमध्ये वाढणाऱ्या रॅडिकलायझेशनकडे लक्ष वेधत, यावर प्रोॲक्टिव्ह उपाययोजना करण्याचे निर्देशही त्यांनी पोलीस यंत्रणांना केले. पोलीस दलातील अंतर्गत संवादावर भर देताना, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कनिष्ठांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. "नेतृत्व म्हणजे लोकांना प्रेरणा देणे" असे नमूद करत, अधिकाऱ्यांनी स्वतःच्या वर्तनातून आदर्श निर्माण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. त्याचबरोबर, प्रत्येक अधिकाऱ्यांने जनतेशी संवाद साधण्यावर भर देण्याच्याही सूचनाही त्यांनी केल्या.

मागील काळात फॉरेन्सिक कामांच्या प्रलंबित प्रकरणात पोलीस प्रशासनाने ठोस उपाययोजना राबवत ही पेंडन्सी लक्षणीयरित्या कमी करण्यात यश मिळवले आहे. पूर्वी 2 ते 3 लाखांपर्यंत प्रकरणे प्रलंबित राहत होती, ती आता मोठ्या प्रमाणात घटली असून ही समाधानाची बाब असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. पुढील काळात सर्व प्रलंबित प्रकरणे पूर्णपणे निकाली काढून फॉरेन्सिक कामकाज रिअल-टाइम पद्धतीने करण्याचे उद्दिष्ट ठेवण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पोलीस दलात चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दरमहा पुरस्कार योजना सुरू करण्याची सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलीस महासंचालकांना केली. तसेच अपेक्षित कामगिरी न करणाऱ्यांना योग्य मार्गदर्शन देण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी गुन्हेगारीविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरण कठोरपणे राबवण्याचे निर्देश पोलीस अधिकाऱ्यांना दिले. ड्रग्ससंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "ही समस्या पुढील पिढीला पंगू करणारी आहे," अशा प्रकरणांवर कठोर कारवाई करून पूर्णतः आळा घालण्याचे आदेश त्यांनी दिले. बेकायदेशीर कृत्यांकडे कोणत्याही परिस्थितीत दुर्लक्ष सहन केले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडिया यांनी केली नवीन ग्रीनफिल्ड स्टील प्रकल्पाची पायाभरणी

मुंबई (दैनिक संध्या) : आज एएम/एनएस इंडियासाठी अतिशय महत्त्वाचा दिवस आहे, कारण आंध्र प्रदेशातल्या अनाकापल्ली जिल्ह्यातील राजय्यपेटा येथे ८.२ दशलक्ष टन दरसाल क्षमता असलेल्या एकात्मिक स्टील प्रकल्पाची पायाभरणी झाली आहे (पर्यावरण मंजुरीनुसार क्षमता). या प्रकल्पासाठी अंदाजे ७०,००० कोटी रुपयांहून अधिकची गुंतवणूक अपेक्षित असून ती टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे. याशिवाय, प्रकल्पाच्या बांधकाम व विकासाच्या प्रक्रियेदरम्यान सुमारे एक लाख थेट व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. या समारंभाला आंध्र प्रदेशचे माननीय मुख्यमंत्री श्री. एन. चंद्राबाबू नायडू, माननीय केंद्रीय मंत्री (स्टील व अवजड उद्योग) श्री. एच. डी. कुमारस्वामी, आंध्र प्रदेशचे माननीय उपमुख्यमंत्री श्री. के. पवन कल्याण, तसेच आंध्र प्रदेशचे माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स व संप्रेषण, मनुष्यबळ विकास (एचआरडी) आणि रिअल-टाइम गव्हर्नन्स मंत्री श्री. नारा लोकेश यांनी उपस्थित राहून गौरव वाढविला. तसेच आर्सेलर मित्तलचे कार्यकारी अध्यक्ष, श्री. लक्ष्मी मित्तल, आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडियाचे अध्यक्ष व आर्सेलर मित्तलचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आदित्य मित्तल, निप्पॉन स्टील कॉर्पोरेशनचे प्रतिनिधी संचालक, अध्यक्ष व सीओओ श्री. तदाशी इमाई, निप्पॉन स्टील कॉर्पोरेशनचे उपाध्यक्ष व आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडियाचे संचालक मंडळाचे सदस्य श्री. ताकाहिरो मोरी, तसेच आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दिलीप उमेन उपस्थित होते. या कार्यक्रमाला राज्यभरातून मोठ्या प्रमाणात उत्साही प्रतिसाद मिळाला आणि कार्यक्रम लक्षवेधक ठरला. हजारो लोकांनी या प्रसंगी सहभागी होण्यासाठी प्रवास केला. हा क्षण एएम/एनएस इंडियाच्या देशातील अत्याधुनिक स्टील उत्पादन सुविधा उभारण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकारण्याची सुरुवात ठरला.

### तेविसाव्या आठवड्यात जन्मलेले बाळ सुखरूप; 'सूर्या हॉस्पिटल'ची किमया

पुणे (दैनिक संध्या) : पुणे येथील 'सूर्या मदर अँड चाइल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल'मध्ये एक ऑक्टोबर २०२५ रोजी २३ व्या आठवड्यात जन्मलेल्या एका बाळाने मृत्यूवर यशस्वी मात केली. जन्माच्या वेळी या बाळाचे वजन अवघे ६७० ग्रॅम (साधारण एका पपईच्या आकाराचे) होते. या नवजात बालकाने रुग्णालयातील नवजात अतिदक्षता विभागात (एनआयसीयू) १०४ दिवसांचा अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक प्रवास पूर्ण केला आहे. वेळेपूर्वी जन्म झाल्यामुळे या बाळाचे अवयव पूर्णपणे विकसित झाले नव्हते. त्यामुळे जन्मानंतरच्या पहिल्या काही तासांपासूनच त्याला 'व्हेंटिलेटर सपोर्ट', फुफ्फुसांच्या कार्यासाठी 'सर्फेक्टंट थेरपी' आणि नवजात तज्ज्ञांच्या पथकाकडून सतत देखरेखीची गरज होती. २३ व्या आठवड्यात जन्मणे हे जीवनासाठी अत्यंत उच्च जोखीम असल्याचे मानले जाते. या टप्प्यावर बाळ गर्भावस्थेच्या सहाव्या महिन्याच्या सुरुवातीला असते आणि फुफ्फुसे नुकतीच 'सर्फेक्टंट' (फुफ्फुसे उघडी ठेवण्यास मदत करणारा पदार्थ) तयार करू लागतात.

## पाच जणांनी अडवले आणि अत्याचारांनी जंगल हादरले

अमरावती (दै. संध्या) :

अमरावतीतील फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीत भयंकर घटना घडली. या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. भानखेडा फाट्यानजिकच्या जंगल परिसरात रविवारी एका १८ वर्षीय महाविद्यालयीन तरुणीला जंगलात फरफटत नेऊन तिच्यावर बलात्कार करण्यात आला. पाच आरोपींनी पीडितेसह तिच्या मित्राला मारहाण केली. त्याला बांधून ठेवले आणि त्यानंतर अत्याचार केले. शनिवारी (२८ मार्च) सायंकाळी १८ वर्षीय तरुणी तिच्या मित्रासोबत मोपेडने चांदूर रेल्वे रोडने फिरण्यास गेली होती. रात्री ८ च्या सुमारास तेथून परतत असताना भानखेडा फाट्याजवळ २५ ते ४६ वयोगटातील काही व्यक्तींनी त्यांना अडवले. पाच जणांनी तरुणी आणि तिच्या मित्राला फरफटत रस्त्याशेजारील जंगलात नेले. तिथे आरोपींनी पैशांची मागणी करत तिच्या मित्राला बेदम मारहाण केली आणि त्याला बांधून ठेवले. पीडितेने जवळ असलेले १२० रुपये आरोपींना दिले, तर, पाचपैकी एकाने तिला मारहाण करत तिच्यावर अत्याचार केला.

धक्कादायक बाब म्हणजे, त्या आरोपीने या कृत्याचा व्हिडीओदेखील मोबाइलमध्ये चित्रित केल्याची माहिती समोर आली आहे.

## रेडमी 15A 5G लाँच; दमदार बॅटरी, मोठा डिस्प्ले आणि परवडणारी किंमत

पुणे (दै. संध्या) :



शाओमी इंडियाने आज भारतीय बाजारात आपला नवीन स्मार्टफोन रेडमी 15A 5G लाँच केला आहे. दैनंदिन वापर लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आलेला हा स्मार्टफोन दीर्घकाळ टिकणारी बॅटरी, मोठा डिस्प्ले आणि विश्वासार्ह कार्यक्षमतेसह ग्राहकांसाठी एक आकर्षक पर्याय ठरणार आहे. रेडमी 15A 5G मध्ये 6300 mAh क्षमतेची दमदार बॅटरी देण्यात आली असून, एकदा चार्ज केल्यानंतर हा स्मार्टफोन जवळपास दोन दिवस वापरता येतो, असा कंपनीचा दावा आहे. यासोबत 15W फास्ट चार्जिंग आणि 7.5W वायर्ड रिव्हर्स चार्जिंगची सुविधा देखील उपलब्ध आहे.

या स्मार्टफोनमध्ये 6.9 इंचाचा मोठा डिस्प्ले देण्यात आला आहे, जो 120Hz रिफ्रेश रेटसह येतो. त्यामुळे स्क्रोलिंग, व्हिडिओ पाहणे आणि ॲप्स वापरण्याचा अनुभव अधिक स्मूथ आणि प्रतिसादक्षम होतो. 800 निट्स ब्राइटनेससह हा डिस्प्ले बाहेरील प्रकाशातही स्पष्ट दिसतो. वेट टच 2.0 तंत्रज्ञानामुळे ओल्या हातांनीही स्क्रीन सहज वापरता येते.

रेडमी 15A 5G मध्ये ऑक्टा-कोर 5G प्रोसेसर देण्यात आला असून, मल्टिटास्किंग, व्हिडिओ कॉलिंग आणि स्ट्रीमिंगसाठी तो सक्षम आहे. ड्युअल-बँड वाय-फाय, ब्लूटूथ 5.4 आणि अचूक नेव्हिगेशन सिस्टीममुळे कनेक्टिव्हिटी अधिक विश्वासार्ह बनते. या फोनमध्ये 32 मेगापिक्सल एआय ड्युअल रिअर कॅमेरा आणि 8 मेगापिक्सल फ्रंट कॅमेरा देण्यात आला आहे. तसेच 200 टक्क्यांपर्यंत व्हॉल्यूम बूस्टसह स्पष्ट आणि दमदार ऑडिओ अनुभव मिळतो. हा स्मार्टफोन अँड्रॉइड 16 आधारित HyperOS 3.0 वर चालतो. कंपनीकडून 4 वर्षे अँड्रॉइड अपडेट्स आणि 6 वर्षे सिक्युरिटी अपडेट्स दिले जाणार आहेत. यासोबत IP52 रेटिंग, फिंगरप्रिंट सेन्सर, ड्युअल सिम सपोर्ट आणि 2TB पर्यंत एक्सपँडेबल स्टोरेजची सुविधा देण्यात आली आहे.

### किंमत आणि उपलब्धता

रेडमी 15A 5G च्या 4GB + 64GB व्हेरिएंटची किंमत ₹12,999 पासून सुरू होते. 4GB + 128GB आणि 6GB + 128GB व्हेरिएंट्सची किंमत अनुक्रमे ₹14,499 आणि ₹16,499 आहे. हा स्मार्टफोन 3 एप्रिलपासून Flipkart, mi.com आणि अधिकृत शाओमी स्टोअर्सवर उपलब्ध होणार आहे.

## स्टाईल आयकॉन हृतिक रोशन ONN चा ब्रँड ॲम्बेसेडर

### प्रीमियम सेगमेंटवर भर

कोलकाता (दै. संध्या) :




देशातील आघाडीची इनरवेअर कंपनी लक्स इंडस्ट्रीज लिमिटेड ने आपल्या प्रीमियम वेअर ब्रँड ONN साठी बॉलिवूड अभिनेता हृतिक रोशन यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती जाहीर केली आहे. या निर्णयाद्वारे कंपनी भारतातील वेगाने वाढणाऱ्या प्रीमियम इनरवेअर आणि थर्मल वेअर बाजारपेठेत आपली पकड अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे.

कंपनीच्या मते, ही भागीदारी ONN ब्रँडची ओळख अधिक बळकट करण्यासोबतच विशेषतः युवा आणि महत्त्वाकांक्षी ग्राहकांपर्यंत पोहोच वाढवण्याच्या धोरणाचा भाग आहे. ONN ला आधुनिक लाइफस्टाइल ब्रँड म्हणून सादर करण्यात आले असून, तो कम्फर्ट, परफॉर्मन्स आणि स्टाईल यांचा संतुलित अनुभव देतो.

अशोक तोडी, चेअरमन, लक्स इंडस्ट्रीज यांनी सांगितले की, ही भागीदारी कंपनीच्या पोर्टफोलिओमध्ये प्रेरणादायी आणि मजबूत ब्रँड उभारण्याच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. ONN हा नवीन पिढीसाठी आधुनिक डिझाइन, अधिक आराम आणि स्टाईल देण्याच्या कंपनीच्या विचारांचे प्रतिनिधित्व करतो आणि हृतिक रोशन यांचे व्यक्तिमत्त्व व फिटनेस ब्रँडच्या मूल्यांशी सुसंगत आहे.

तर साकेत तोडी, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, लक्स इंडस्ट्रीज यांच्या मते, या सहकार्यामुळे ब्रँडची दृश्यता वाढेल आणि प्रीमियम तसेच परफॉर्मन्स-आधारित इनरवेअर शोधणाऱ्या ग्राहकांशी अधिक दृढ नातं निर्माण होईल.

या सहकार्याबाबत प्रतिक्रिया देताना Hrithik Roshan (हृतिक रोशन) यांनी सांगितले की, वैयक्तिक स्टाईलची पायाभूत गोष्ट म्हणजे आराम आणि आत्मविश्वास. ONN चा गुणवत्ता, नवकल्पना आणि आधुनिक डिझाइनवरील भर त्यांच्या लाइफस्टाइलशी जुळणारा आहे.

या मोहिमेत ते टीव्ही, डिजिटल प्लॅटफॉर्म, रिटेल आणि आउटडोअर माध्यमांवर विविध जाहिरात उपक्रमांमध्ये दिसणार आहेत. या मोहिमेची निर्मिती रेडिफ्यूजन ब्रँड सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी केली आहे.

प्रमोद शर्मा, नॅशनल क्रिएटिव्ह डायरेक्टर, रेडिफ्यूजन यांनी सांगितले की, ONN हा स्टाईल, परफॉर्मन्स आणि दैनंदिन आराम यांचा उत्कृष्ट संगम आहे आणि हृतिक रोशन हे या सर्व गुणांचे अचूक प्रतिनिधित्व करतात. देशभरातील मल्टी-चॅनल प्लॅटफॉर्मवर ही मोहीम सुरू करण्यात येत असून, त्यामुळे ONN ची पोहोच स्टाईल-जागरूक युवा ग्राहकांपर्यंत अधिक मजबूत होणार आहे. या नव्या भागीदारीमुळे लक्स इंडस्ट्रीज लिमिटेड ONN ब्रँडच्या वाढीस गती देत प्रीमियम सेगमेंटमध्ये आपली स्थिती अधिक भक्कम करण्याच्या दिशेने पुढे जात आहे.

## टोईंगने पुण्यात आपली पकड केली मजबूत

### १,००,००० पेक्षा जास्त स्वस्त खाण्याचे पर्याय उपलब्ध

पुणे (दै. संध्या) :

स्वस्त दरात फूड डिलीव्हरी करणारे ॲप टोईंगने आज जाहीर केले की, गेल्या 6 महिन्यात त्यांना ग्राहकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला आहे. टोईंग आपल्या ॲपवर खाण्यापिण्याच्या वस्तूंवर सर्वात कमी किमतीचे आश्वासन देते आणि हॉटेलमधील मेनू कार्डपेक्षा कमी किंवा त्याच्या बरोबरीने दर देण्याची खात्री देते. कंपनीने देशभरातील 3700 पेक्षा जास्त हॉटेल्सचे नेटवर्क तयार करून शहरात आपली पकड मजबूत केली आहे, ज्यामध्ये 300 प्रकारच्या डिश श्रेणींमधील 1,00,000 पेक्षा जास्त खाद्यपदार्थ उपलब्ध आहेत. बाजारात उपलब्ध असलेले टोईंग हे सर्वात स्वस्त दरात फूड डिलीव्हरी करणारे ॲप आहे. गेल्या 7 महिन्यात टोईंगचा विस्तार भारतातील 18 शहरांमध्ये झाला आहे. हे ॲप आग्रा, वडोदरा, गुवाहाटी, नाशिक, नागपूर, पटना, औरंगाबाद, भोपाळ, दिल्ली, गुरुग्राम, नोएडा, फरीदाबाद, गाझियाबाद, मुंबई, चंदीगड आणि अहमदाबादमध्ये सुरू झाले आहे. सर्वात कमी किमतीचे आश्वासन देण्यासोबतच, टोईंगवर कोणत्याही ऑर्डरसाठी पॅकेजिंग शुल्क किंवा प्लॅटफॉर्म फी घेतली जात नाही. ग्राहक बिर्याणी, बर्गर आणि बाऊल्स यांसारखे विविध पदार्थ 99 रूपयांपेक्षा कमी किमतीत ऑर्डर करू शकतात. टोईंगचे स्वस्त आणि परवडणारे दर खूपच यशस्वी ठरले आहेत, ज्यामुळे पुण्यातील नवीन नोकरी लागलेले तरुण आणि कॉलेज विद्यार्थ्यांसाठी पदार्थ ऑर्डर करण्यासाठी हे पहिले पसंतीचे ॲप बनले आहे. टोईंगवर पुण्यातील काही अतिशय लोकप्रिय हॉटेल्स उपलब्ध आहेत, ज्यामध्ये बर्गर किंग, वेंडीज बर्गर्स, पिझ्झा हट, मॅकडोनाल्ड्स, ला पिनोझ पिझ्झा, सबवे, फासोस - रॅप्स, रोल्स अँड शावरमा, रोल्स मॅनिया - रोल्स, रॅप्स अँड मोअर, हल्दीराम रेस्टॉरंट यांसारख्या राष्ट्रीय ब्रँड्सचा समावेश आहे.


## महाराष्ट्र शासन

**क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग, पुणे**

**ई-निवीदा सुचना**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत मिशन लक्षवेध योजना अंतर्गत उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग, पुणे येथील मिशन लक्षवेध योजने ची अंमलबजावणीची अंमलबजावणी करण्यासाठी खेळाडूंना प्रशिक्षण देण्याकरीता क्रीडा मार्गदर्शक तसेच त्याचे पुर्ण व्यवस्थापन करणेकरीता व्यवस्थापक, मैदानसेवक व वार्डन पुरविण्याकरीता पात्र व अनुभव असलेल्या एजन्सी/कंपनी नियुक्त करण्यासाठी राज्यातील नोंदणीकृत, परवानाधारक संस्थांकडून दोन लिफाफा व खुल्या स्पर्धात्मक पद्धतीने ऑनलाईन निवीदा मागविण्यात येत आहेत.

पुणे येथे एक वर्षाकरिता वरील सेवा देवू शकणाऱ्या परवानाधारक / नोंदणीकृत, मान्यताप्राप्त संस्थेकडून ऑनलाईन निविदा दिनांक २० मार्च २०२६ दुपारी ४.०० ते दिनांक ७ एप्रिल २०२६ दुपारी ४.०० वाजेपर्यंत ई प्रणालीच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा उपलब्ध राहतील.

| कामाचा तपशील | शुल्क | इच्छुक संस्थांचा तपशिल |
|---|---|---|
| पुणे येथील मिशन लक्षवेध योजने ची अंमलबजावणी ची अंमलबजावणी करण्यासाठी खेळाडूंना प्रशिक्षण देण्याकरीता क्रीडा मार्गदर्शक तसेच त्याचे पुर्ण व्यवस्थापन करणेकरीता व्यवस्थापक, मैदानसेवक व वार्डन पुरविणे | रुपये २५,०००/- निविदा शुल्क रु.१,१२,०००/- निविदा अनामत रक्कम (EMD) | परवानाधारक /नोंदणीकृत, मान्यताप्राप्त संस्था |

निविदा शुल्क व ईएमडी ची रक्कम ऑनलाईन गेट वे पध्दतीने जमा करण्यात यावी. अधिक माहितीसाठी उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा पुणे विभाग पुणे विभागीय क्रीडा संकुल, सर्व्हे नं.१९१, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, मोझे महाविद्यालयासमोर येरवडा, पुणे ४११००६ येथे संपर्क साधावा.

प्राप्त झालेल्या ई निविदा शक्य झाल्यास दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा पुणे विभाग पुणे विभागीय क्रीडा संकुल, सर्व्हे नं.१९१, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, मोझे महाविद्यालयासमोर येरवडा पुणे ४११००६ यांचे कार्यालयात उपस्थित प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील. कोणतेही कारण न देता निविदा स्विकारणे अथवा नाकारणे तसेच निविदा रद्द करण्याचे सर्व अधिकार उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा पुणे विभाग पुणे हे राखून ठेवीत आहेत.

स्वाक्षरीत-/
उपसंचालक,
क्रीडा व युवक सेवा,
पुणे विभाग, पुणे

क्रमांक : आरओसी-2025-26/क्र-5/C6900



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविणेत येते की, ओतुर हद्दीतील जमीन मिळकत खालीलप्रमाणेः हे. ९९ आर. जमीन खाते क. ५५४४ वरील १) गट नं. ५९५/२/क क्षेत्र आकार ६ रू. १२ पैसे, आकार १ रू. ४३ पैसे पैकी कर्जदार चंद्रकात लक्ष्मण डुबरे यांचे हिश्याचे क्षेत्र ०हे. ४१ आर, आकार २ रू. ५४ पैसे २) ग्रामपंचायत मिळकत नं. २१५४ इमारत २४ ४१९ वर मं. कौले शौचालयासह क्षेत्र ४५६ चौ. फुट अशी जमिन मिळकत व घर मिळकत श्री चंद्रकांत लक्ष्मण पाटील डुंबरे उर्फ डुबरे यांचे वडिलोपार्जित मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे सदर मिळकत जमिन व घर मालकाला तारण गहाण ठेवुन कर्ज घेण्यासंबंधी आमचे आशिल शिवकृपा सहकारी पतपेढी लि. शाखा नारायणगाव ता. जुन्नर जि.पुणे या शाखेमध्ये जमिन मालकांनी कागदपत्रे दिलेली आहेत व त्या अनुषंगाने माझे आशिलांनी कर्जासंबंधी प्रोसिजर चालु केलेली आहे परंतु भविष्यात कोणत्याही प्रकारचे लिटिगेशन होऊ नये म्हणुन सदर मिळकतीचे टायटल क्लिअर तपासण्यासाठी सदर जाहीर नोटीस प्रसिध्द करत आहोत. सदर मिळकतीवर कोणाचाही किंवा कोणत्याही संस्थेचा कसला हक्क, हितसंबंध, मालकी व कुठल्याही प्रकारचा भाडेपट्टा, बोजा, गहाण, दान, पोटगी, बक्षीस कब्जा इतर कसल्याही प्रकारचा हक्क, आधिकार, हितसंबंध दावा असेल तर त्याने नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कागदपत्रे व पुराव्यासह लेखी हरकत नोंदवावी मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकतीसंदर्भात कोणचाही हक्क, आधिकार व हितसंबंध नाही आल्यास तो सोडुन दिला आहे असे समजुन माझे आशिल शिवकृपा सहकारी पतपेढी लि. शाखा नारायणगाव ता. जुन्नर जि.पुणे ही संस्था सदर जमिन व घर मिळकत तारण गहाण ठेवुन कर्जासंबंधीचा व्यवहार पुर्ण करती तसेच मुदतीनंतर आलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे मिळकत हा या जाहीर नोटीसचा विषय आहे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस

जुन्नर
दि. ३१/०३/२०२६

सही/-
श्री.डी.व्ही. हांडे ॲडव्होकेट
फुलसुंदर सुपर मार्केट नारायणगाव
ता. जुन्नर जि. पुणे
मो.नं.९९६०४४२३८४


## प्रिया बापट आणि उमेश कामत यांची मुख्य भूमिका असलेल्या 'हे काय नवीन?' चे विशेष स्ट्रिमिंग मराठी ZEE5वर

पुणे (दै. संध्या) :



मराठी मनोरंजनाचे प्रमुख ठिकाण असलेल्या मराठी ZEE5 हृदयस्पर्शी आणि आपल्याशा वाटणाऱ्या कथाकथनाचे हक्काचे व्यासपीठ असून 'हे काय नवीन?' या नवीन ओरिजनल सिरीजचे आता स्ट्रिमिंग होणार असून त्यात एक आनंददायी वळणही आहे! या सिरीजमध्ये खऱ्या आयुष्यात एकमेकांचे जोडीदार असलेल्या उमेश कामतने आदित्य तर प्रिया बापट हिने रमाची भूमिका साकारली आहे. ही मालिका आकर्षण, आराम आणि प्रामाणिकपणाचा एक अतिरिक्त पदर उलगडते जो केवळ एक वास्तविक बंध निर्माण करू शकतो. कारण प्रामाणिकपणे सांगायचे तर -जीवनाचा शोध घेणाऱ्या विवाहित जोडप्याच्या भूमिकेत आधीपासूनच असलेल्या या जोडप्यापेक्षा इतर कुणी या व्यक्तिरेखा अधिक चांगल्या साकारल्या असत्या?

वरुण नार्वेकर दिग्दर्शित, या सिरीजमध्ये आयुष्यातील मोठे टप्पे गाठल्यानंतर काय घडते यावर एक प्रेमळ, जीवनाच्या पैलूवरील भाष्य आहे. प्रिया बापट, उमेश कामत, शुभांगी गोखले, उदय टिकेकर, सुयोग गोऱ्हे, राजसी भावे, ओमकार गोवर्धन, तन्वी कुलकर्णी आणि पायल जाधव अशा उत्कृष्ट कलाकारांच्या टीमसह, ही सिरीज रमा आणि आदित्य यांचे चित्रण करते, ज्यांचे आयुष्य सुरळीत, पुरेसे नीट जगलेले आहेत. त्यांना आता प्रश्न पडला आहे, "ठीक आहे... आता काय?"

दैनंदिन जीवनाच्या पार्श्वभूमीवर हे काय नवीन? ही सिरीज अनेकदा दुर्लक्ष करत असलेल्या छोट्या छोट्या क्षणांमध्ये, मूक विरामांमध्ये, बदलत्या स्वप्नांमध्ये आणि दीर्घकालीन नातेसंबंधांमध्ये शिरकाव करणाऱ्या न बोललेल्या प्रश्नांमध्ये बुडून जाते. आपल्या दैनंदिन जीवनचक्रातून विसावा म्हणून रमा सबॅटिकल घ्यायचे ठरवते. स्वतःला क्रिएटिव्ह वेंचरमध्ये झोकून देते. छोटेखानी, स्वतः सुरू केलेली क्लोदिंग लाईन!

## थोडक्यात पण महत्वाचे...



### एआयचा वापर करताना नैतिकतेला महत्व द्या – आनंद कुमार सिन्हा

पिंपरी (दैनिक संध्या) : तंत्रज्ञान हे जागतिक परिवर्तनाचे मुख्य साधन आहे. आज जागतिक तंत्रज्ञान कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नव्या टप्प्यावर आहे. एआय, जेनरेटिव एआय आणि एजेंटिक एआय हे एआय चे टप्पे आहेत. एआय हे स्पर्धक नसून सहकार्य करणारे साधन आहे. मात्र एआयचा वापर करताना नैतिकतेला महत्व द्या असे मार्गदर्शन ग्लोबल सीआयओ अँड टेक्नॉलॉजी व्हिजनरीचे आनंद कुमार सिन्हा यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठच्या (पीसीयू) स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी तर्फे आयइइइचा (आय ट्रिपल इ – IEEE) शपथविधी समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी आयइइइ एसीएम टीम चे उद्घाटन करण्यात आले. अलिअक्सान्द्र मात्सुकौ यांनी बेलारूस देशाबद्दल माहिती देताना सांगितले की, बेलारूस हा औद्योगिकदृष्ट्या सक्षम, प्रगत शेती आणि विकसित सेवा क्षेत्र असलेला देश आहे. उद्योग, तंत्रज्ञान आणि शिक्षण क्षेत्रात भारत – बेलारूस सहकार्याच्या मोठ्या संधी आहेत. बेलारूस देशाची उच्च वैज्ञानिक क्षमता असून हे युरेशियन बाजारपेठेत प्रवेशासाठी एक महत्त्वपूर्ण केंद्र आहे. यावेळी बेलारूस देशाचे प्रतिनिधी अलिअक्सान्द्र मात्सुकौ, पीसीयू चे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, प्र-कुलगुरु डॉ. सुदीप थेपडे, कम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंगचे संचालक डॉ. अभिजीत बानूबकोडे, कम्प्युटर सायन्स विभाग प्रमुख डॉ. स्वाती शिर्के देशमुख आदी उपस्थित होते.



### पिंपरी चिंचवडमध्ये महापौर चषक राष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेला उत्साहात सुरुवात

■ पिंपरी चिंचवडमध्ये महापौर चषक राष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेला उत्साहात सुरुवात

पिंपरी (दैनिक संध्या) : शरीरसौष्ठव घडवताना स्टिरॉइड्ससारख्या औषधांचे सेवन करून कृत्रिम पद्धतीने शरीर बनवण्याच्या ऐवजी तरुणांनी नैसर्गिक बॉडी बिल्डिंगकडे लक्ष देत आरोग्यपूर्ण जीवनशैलीचा अवलंब करावा, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने इंडियन बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस फेडरेशन, महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन यांच्या संयुक्तविद्यमाने व पिंपरी चिंचवड अमेच्यूर बॉडी बिल्डिंग असोसिएशन यांच्या सहकार्याने 'महापौर चषक राष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धा २०२६' चे आयोजन चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे,नगरसदस्य धर्मपाल तंतरपाळे,शितल शिंदे, मंदार देशपांडे, नगरसदस्या अर्चना सस्ते यांच्यासह इंडियन बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस फेडरेशनचे डॉ. संजय मोरे, राजेश सावंत, ॲड. सचिन रणदिवे, महापालिकेचे उपायुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह स्पर्धक आणि नागरिक उपस्थित होते. महापौर रवि लांडगे म्हणाले, 'तरुणांनी आरोग्याला सर्वाधिक प्राधान्य देत नैसर्गिक पद्धतीने शरीरसौष्ठव घडवण्यावर भर द्यावा. आरोग्य हीच खरी संपत्ती असून इतर सर्व संपत्तीपेक्षा ती अधिक महत्त्वाची आहे. पैसा, प्रतिष्ठा आणि इतर गोष्टी आयुष्यात पुन्हा मिळू शकतात; मात्र एकदा आरोग्य बिघडले तर ते पूर्ववत करणे कठीण असते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या शरीरावर प्रेम करत नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि संयम यांचा अवलंब करून नैसर्गिक बॉडी बिल्डिंगकडे लक्ष द्यावे,' असे देखील त्यांनी सांगितले.

### एकावर चाकूने हल्ला; आरोपीला अटक

पिंपरी (दैनिक संध्या) : रावेत परिसरात भरदुपारी घडलेल्या धक्कादायक घटनेत एका व्यक्तीवर धारदार चाकूने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात फिर्यादी महादेव बिरादार हे जखमी झाले असून पोलिसांनी आरोपी अनिल चव्हाण याला अटक केली आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना दि.२७ मार्च २०२६ रोजी दुपारी सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास होंडा शोरूमसमोर, डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज रोड, धर्मराज चौक, रावेत येथे घडली. याप्रकरणी (दि.२८) रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महादेव दिलीप बिरादार (वय ४५, व्यवसाय-भंगार जमा करणे) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी अनिल होशिलाल चव्हाण याच्यासोबत पूर्वीच्या वादातून भांडण झाले. या वादाचा राग मनात धरून आरोपीने फिर्यादीशी शिवीगाळ करत त्याच्यावर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात फिर्यादीच्या डाव्या हाताच्या दंडावर व मनगटाजवळ वार करून त्यांना जखमी करण्यात आले. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपीला ताब्यात घेतले आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक देशमुख हे करीत आहे.

### काळ्या धंद्यांची श्वेतपत्रिका काढाच.. पालिका लुटणाऱ्यांवर कारवाई करा..!

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आयुक्तपदी डॉ. विजय सूर्यवंशी यांची नियुक्ती झाल्यापासून त्यांच्यासमोर कोणकोणती आव्हाने आहेत, याची सार्वत्रिक चर्चा सुरू झाली. 'नव्या आयुक्तांपुढे अडचणींचा डोंगर' या आशयाच्या बातम्याही छापून झाल्या. वास्तविक पाहता, कोणताही आयुक्त नव्या ठिकाणी रूजू होताना तेथील आवश्यक माहिती घेतच असतो. (मग त्यात धंद्याचे, तोडपाणीचे असे सगळे विषय आले). डॉ. सूर्यवंशी यांनी तशी सर्वप्रकारची माहिती घेतली असणार आणि या माहितीच्या आधारे पिंपरी पालिकेत आपल्यासमोर नेमके काय वाढून ठेवले आहे, याचा पुरेपूर अंदाज त्यांना आला असणार. मुळातच महसूल विभागातले अधिकारी तितके हुशार असतात. खालून वरपर्यंत पदोन्नतीच्या प्रवासात ते बऱ्यापैकी तयार झालेले असतात. नव्या आयुक्तांचे स्वागत, सत्कार, कोडकौतुक असे सोपस्कार पार पडल्यानंतर, डॉ. सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत १४ तास चाललेल्या सर्वसाधारण सभेतील चर्चेत, सर्वपक्षीय सदस्यांनी वेगवेगळे विषय अक्षरश: उकरून काढले. विशेषत: गेल्या चार वर्षातील प्रशासकीय काळातील अनागोंदी कारभाराची यथेच्छ चिरफाड केली. अभ्यासपूर्ण मुद्दे उपस्थित करत कधी शेलक्या शब्दात समाचार घेत, तर कधी गंभीर स्वरूपाचे आरोप करत सर्वपक्षीय सदस्यांनी आपल्या तीव्र भावना सभागृहात व्यक्त केल्या. राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका सदस्याचे वक्तव्य खळबळजनक होते. याआधीचे आयुक्त चोर होते. ते अलिबाबा आणि त्यांच्या ४० चोरांनी मिळून पालिका धुवून खाल्ली. अलिबाबाची बदली झाली. उरलेले चोर इथेच आहेत आणि त्यांचे दरोडे टाकण्याचे काम सुरूच आहे. त्या चोरांचा नव्या आयुक्तांनी बंदोबस्त करावा, अशा आशयाचे विधान त्याने सभेत केले. याच पध्दतीने अन्य सदस्यांनी देखील अचूक संदर्भ देऊन अनेक प्रकरणांची पोलखोल केली आणि प्रशासक काळातील कोट्यवधींचा भ्रष्टाचार नव्या आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिला.

# उन्हाळ्यात पाणीटंचाई टाळण्यासाठी महापौरांचे निर्देश

**सर्वंकष उपाययोजना करण्याचे आयुक्तांना दिले आदेश**

पिंपरी (दै. संध्या) :



उन्हाळा हंगाम समीप येत असून उपलब्ध जलसाठा, भूजल पातळीतील घट व वाढती पाण्याची मागणी लक्षात घेता शहरात संभाव्य पाणीटंचाईची स्थिती निर्माण होऊ नये, यासाठी महापौर रवि लांडगे यांनी महापालिका आयुक्तांना तातडीने प्रभावी उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांना नियमित, समतोल व पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा सुनिश्चित करणे ही महापालिकेची वैधानिक जबाबदारी असून त्यानुसार सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश महापौरांनी दिले.

महापौरांनी प्रशासनाला उन्हाळा पूर्व कृती आराखडा तयार करून प्रत्येक विभागाला स्पष्ट जबाबदाऱ्या सोपविण्याच्या सूचना केल्या. तसेच उपलब्ध धरण साठा, जलशुद्धीकरण केंद्रे व वितरण यंत्रणेचे सखोल परीक्षण करून पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करण्यावर भर देण्यात आला आहे. शहरातील मुख्य व उपजलवाहिन्यांमधील गळती तातडीने शोधून दुरुस्ती करण्यासह अनधिकृत नळजोडण्या व पाणीचोरीवर कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. संभाव्य टंचाईग्रस्त भागांची पूर्वनियोजित यादी तयार करून आवश्यकतेनुसार टँकर पुरवठा व्यवस्था सज्ज ठेवण्याचेही सांगण्यात आले. याशिवाय सार्वजनिक बोअरवेल, विहिरी व पूरक जलस्रोत कार्यान्वित ठेवण्याबरोबरच पाणीपुरवठ्याशी संबंधित तक्रारींवर तातडीने प्रतिसाद देण्यासाठी सक्षम तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करण्याचे निर्देश महापौरांनी दिले. तसेच पाणी बचत, पुनर्वापर व अपव्यय नियंत्रणाबाबत जनजागृती करण्यावरही विशेष भर देण्यात आला आहे.

"उन्हाळ्यात नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने नियोजनबद्ध आणि परिणामकारक उपाययोजना तातडीने राबविणे आवश्यक आहे. पाणीपुरवठा ही मूलभूत गरज असून त्यामध्ये कोणतीही दिरंगाई किंवा निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही. सर्व विभागांनी समन्वय साधून काम करत नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा मिळेल याची खात्री करावी," असे महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.

सदर बाब अत्यंत महत्त्वाची असून सर्व विभागांनी समन्वय साधून तात्काळ अंमलबजावणी करावी. उन्हाळा कालावधीत नागरिकांना पाणीटंचाई जाणवू नये, यासाठी प्रशासनाने आवश्यक त्या सर्व उपाययोजना काटेकोरपणे राबवाव्यात, असे स्पष्ट निर्देश महापौरांनी आयुक्तांना दिले आहेत.

## पदपथावरील सिमेंट काँक्रीटमुळे वृक्ष मरणासन्न

पिंपरी (दै. संध्या) :



पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक सिमेंट व डांबरी रस्त्यांच्या मार्गात असलेल्या झाडांच्या बुंध्याभोवती पुरेशी मोकळी जागा न सोडल्याने शहरातील अनेक झाडांचे अस्तित्व धोक्यात आल्याचे दिसून येत आहे. झाडांच्या बुंध्याभोवतीची जागा मोकळी न केल्याने झाडांचा श्वास कोंडू लागला आहे. सिमेंट, डांबरी रस्त्यांची कामे, अर्बन स्ट्रीटनुसार पदपथ विकसित करताना रस्त्यालगत असलेल्या बहुतांश झाडांच्या बुंध्याभोवती कंत्राटदाराने सिमेंटचे आवरण केल्याचे सर्रास दिसत आहे. यामुळे झाडांना पाणी टाकता येत नाही. मुळांना व्यवस्थित पाणी मिळत नसल्याने झाडांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. त्यामुळे काही झाडे मरणासन्न अवस्थेत येऊ लागल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे वृक्षप्रेमी नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे. शहरात तब्बल ३२ लाख झाडे असल्याचे वृक्षगणनेतून उघड झालेले आहे. झाडांच्या चांगल्या वाढीसाठी झाडांच्या बुंध्याला एक मीटर चौरस माती असायला हवी. परंतु शहरात ठिकठिकाणी झाडांना सिमेंट काँक्रीटचे आवरण केले जात आहे.

## रहाटणीतील सार्वजनिक जागेचे टाकाऊ वस्तूंमधून सुशोभीकरण

**महिला सक्षमीकरणाचा संदेश; महापालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत अभिनव उपक्रम**

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक २७ मधील रहाटणी–श्रीनगर परिसरात एक अभिनव उपक्रम राबविण्यात आला आहे. तमारा सोसायटी, नखाते चौक परिसरातील सार्वजनिक जागेचे टाकाऊ वस्तूंच्या कल्पक वापरातून आकर्षक सुशोभीकरण करण्यात आले आहे. या उपक्रमात सफाई कर्मचाऱ्यांनी केवळ स्वच्छता न करता टाकाऊ टायर, पाइप्स, प्लास्टिक बॉटल्स, फायबर पुतळे तसेच RRR सेंटरमध्ये जमा होणाऱ्या साड्या व अलंकारिक वस्तूंचा वापर करून रस्त्याकडील जागा आणि सार्वजनिक ठिकाणे





सुंदर केली. या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचा प्रभावी संदेशही देण्यात आला. या सुशोभीकरण उपक्रमाचे उद्घाटन महानगरपालिकेचे अधिकारी, नगरसेवक, सोसायटी पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक तसेच स्थानिक नागरिक आणि दुकानदार यांच्या हस्ते करण्यात आले. हा उपक्रम उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी 'ग' क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, सहाय्यक आरोग्य अधिकारी अतुल सोनवणे, मुख्य आरोग्य निरीक्षक पृथ्वीराज कांबळे, शशिकांत मोरे, उमेश कांबळे, आरोग्य निरीक्षक गणेश राजगे तसेच आरोग्य विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डिवाईन वेस्ट मॅनेजमेंट अँड सर्व्हिसेस संस्था आणि शुभम उद्योग संस्थेने या उपक्रमात विशेष योगदान दिले. प्रभाग २७ मधील नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, सागर कोकणे, नगरसेविका सविताताई खुळे व अर्चनाताई तापकीर यांनीही सहभाग नोंदविला. यावेळी तमारा सोसायटीचे चेअरमन संतोष जाधव, सेक्रेटरी डोंगरे व रानपिसे यांच्या हस्ते उपस्थितांचा सत्कार करण्यात आला. शहरात उघड्यावर टाकल्या जाणाऱ्या कचऱ्यामुळे अस्वच्छता व दुर्गंधी पसरते. यावर उपाय म्हणून अशा ठिकाणी सुशोभीकरण करून कचरा न टाकण्याचे आवाहन करण्यात येत असून नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

## तिसऱ्या मजल्यावरून फेकल्याने कामगाराचा जागीच मृत्यू

**चिंचवडमध्ये बांधकाम साइटवर थरार**

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी-चिंचवड शहरातील वाल्हेकरवाडी परिसरात एका बांधकाम सुरू असलेल्या इमारतीवर किरकोळ वादातून भीषण हत्येची घटना घडली आहे. दोन कामगारांमध्ये झालेल्या बाचाबाचीचे रूपांतर थेट जीवघेण्या हल्ल्यात झाले असून, एका कामगाराने संतापाच्या भरात सहकाऱ्याला तिसऱ्या मजल्यावरून खाली फेकून दिले. या घटनेत २६ वर्षीय केशव कुमार महतो याचा जागीच मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, चिंचवड पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या बांधकाम साइटवर केशव महतो आणि आरोपी कामगार एकत्र काम करत होते. कामाच्या दरम्यान दोघांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला. हा वाद वाढत जाऊन संतापाच्या भरात आरोपीने केशवला इमारतीवरून खाली ढकलले. उंचावरून खाली कोसळल्याने त्याला गंभीर दुखापत होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच चिंचवड पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपीचा शोध घेतला जात आहे. या धक्कादायक घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, बांधकाम मजुरांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. किरकोळ वादातून घडलेल्या या हत्येमुळे कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



## सोसायटीची लिफ्ट कोसळून तरुणाचा करुण अंत

तळेगाव दाभाडे (दै. संध्या) :

तळेगाव दाभाडे येथील निसर्ग हौसिंग सोसायटीमध्ये लिफ्टचा दोर तुटून झालेल्या भीषण अपघातात ३२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. या प्रकरणी लिफ्टच्या देखभालीकडे दुर्लक्ष केल्याचा ठपका ठेवत सोसायटीच्या चेअरमनसह ११ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत तरुणाचे नाव दिनेश सुरंगे असे असून त्यांचे भाऊ रितेश सुरंगे (रा. किनळे, हवेली) यांनी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनेश सुरंगे हे लिफ्टने खाली जात असताना लिफ्ट सहाव्या आणि सातव्या मजल्यादरम्यान अडकली. त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू असतानाच अचानक लिफ्टचा दोर तुटला आणि लिफ्ट थेट खाली कोसळली. या भीषण अपघातात दिनेश गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेत निष्काळजीपणा झाल्याचा आरोप करत सोसायटीचे चेअरमन पुंडलिक वारके यांच्यासह दीपक हेंद्रे, विनायक खोराटे, निलेश गवळी, प्रविण श्रीवास, सचिन शिर्के, प्रांजली पिंगळे, धनश्री वैद्य, वैशाली बोरकर, रामभाऊ साबळे आणि संतोष आसवले यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार, लिफ्टच्या देखभालीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे हा अपघात घडला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक खामगळ करत आहेत.

## अभय योजनेला पिंपरी-चिंचवडकरांचा प्रतिसाद, मालमत्ता कर वसुली ९०० कोटी पार

पिंपरी (दै. संध्या) :




पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने चालू आर्थिक वर्षात (दि.१ एप्रिल २०२५ ते २९ मार्च २०२६) मालमत्ता कर वसुलीत उल्लेखनीय कामगिरी करत तब्बल ९०० कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. आर्थिक वर्ष संपण्यासाठी अगदी शेवटचे दोन दिवस शिल्लक राहिले असून थकबाकीदारांना लवकरात लवकर मालमत्ता कर भरुन महापालिकेच्या अभय योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. मालमत्ता कर विभागाचे नियोजनबद्ध व लक्ष्यवेधी कामकाज, तसेच ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही माध्यमांतून उपलब्ध करून दिलेल्या सुलभ सेवांमुळे मालमत्ता कर वसुली ९०० कोटीपेक्षा जास्त झाली आहे. कर भरणाऱ्या नागरिकांनी दाखविलेल्या सहकार्याबद्दल महापौर रवि लांडगे यांनी सर्व करदात्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. याशिवाय महापालिकेमार्फत थकबाकीदार नागरिकांना दिलासा देण्यासाठी अभय योजना राबविण्यात येत असून, या योजनेअंतर्गत दि.१ मार्च २०२६ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत थकीत मालमत्ता कर एकरकमी भरल्यास विलंब दंडावर तब्बल ९० टक्के सवलत देण्यात येत आहे. आर्थिक वर्ष संपण्यास अवघे दोन दिवस शिल्लक राहिले असल्याने ही योजना नागरिकांसाठी शेवटची सुवर्णसंधी ठरत आहे. त्यामुळे सर्व थकबाकीदारांनी या योजनेचा लाभ घेऊन तात्काळ कर भरणा करावा, असे आवाहन उपायुक्त सचिन पवार यांनी केले आहे. पिंपरी चिंचवड शहरात सुमारे ७ लाख ३२ हजार मालमत्तांची नोंद असून त्यापैकी ५ लाख ८६ हजार ८७६ मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराचा भरणा केला आहे. दरवर्षी कर भरणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढत असून नागरिकांमध्ये कर भरण्याबाबत जागरूकता वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## सकल हिंदू समाजाने कायम तत्पर रहावे

**भरत अमदापुरे : 'जो बोले सो निहाल...' घोषणांनी गुरुद्वारा परिसर दणाणला..!**

आकुर्डी (दै. संध्या) :

सकल हिंदू समाजाने आपली महनीय संस्कृती परंपरा, गौरवशाली इतिहास समजून घेतला पाहिजे. या स्वबोधासह शत्रूबोध लक्षात घेणे देखील आवश्यक असून जाती पाती विसरून सकल हिंदू समाज या नात्याने धर्म जागृतीसाठी कायम तत्पर राहण्याचे आवाहन प्रसिद्ध लेखक, व्याख्याते भरत अमदापुरे यांनी केले. ते आकुर्डी रेल्वे स्थानक परिसरातील गुरुद्वारा वस्ती परिसरातील सकल हिंदू समाज आयोजित भव्य हिंदू संमेलनात ते बोलत होते.

'जो बोले सो निहाल.. सत श्री अकाल', भारत माता की जय, जय श्रीराम, जय जय श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज की जय या घोषणांनी गुरुद्वारा परिसर दणाणला होता. व्यासपीठावर संत तुकाराम महाराजांचे वंशज, युवा कीर्तनकार ह.भ.प.अनिकेत महाराज मोरे, गुरुद्वारा परिसर हिंदू संमेलन समितीचे अध्यक्ष



सामाजिक कार्यकर्ते संतोष चोरे प्रामुख्याने उपस्थित होते.

पुढे बोलतांना भरत अमदापुरे यांनी युवकांनी आपल्या भारताचा गौरवशाली इतिहास समजून घेऊन राष्ट्रावर आक्रमण केलेल्या शत्रूविषयी जागृती ठेवली पाहिजे. मंदिरे सरकारमुक्त झाली पाहिजे. मंदिराचे व्यवस्थापन स्वतंत्र हवे असे परखड मत त्यांनी मांडले. सध्या समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी आपल्या कुटुंबात आपल्या धर्माचे, भारतीय संस्कृती परंपरेचे संस्कार हवे, आपली कुटुंब व्यवस्था टिकवण्याची जबाबदारी प्रत्येकाची असून कुटुंबव्यवस्था संस्कारी, मजबूत राहिली तर देश देखील मजबुतीने उभा राहील. प्रत्येकाने पर्यावरणाचे भान राखून जातीपातीच्या बाहेर येऊन अवघा हिंदू बंधू या भूमिकेतून एकत्रित आले पाहिजे असे सांगितले.

ह. भ. प.अनिकेत मोरे महाराज यांनी सकल हिंदू एकत्रीकरणामागची भूमिका विषद करून तरुणांनी धर्म कार्य समजून जागृतीसाठी कायम तत्पर राहण्याचे आवाहन केले. अध्यक्ष संतोष चोरे यांनी अशा संमेलनाची गरज निर्माण झाली असल्याचे सांगून सर्व संस्था संघटना यांनी सकल हिंदू समाजासाठी एकत्र येऊन काम करण्याची गरज असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कलावर्धिनी डान्स कंपनीच्या सौ. सायली काणे आणि कलाश्री नृत्यशाळा संस्थेच्या त्यांच्या शिष्या ईश्वरी, याज्ञिकी, स्वरा, उन्नती यांनी सादरीकरण केले. त्याचबरोबर मैदानी खेळाचे प्रात्यक्षिके झाली. कार्यक्रमाला गुरुद्वारा परिसरातील मातृशक्ती, युवा वर्ग मोठ्या संख्येने एकवटला होता. कार्यक्रमप्रसंगी सांस्कृतिक वार्तापत्राच्या संघ यात्रा विशेषांकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकांत माळी तर आभार चैतन्य पंडित यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी सकल हिंदू समाज गुरुद्वारा परिसर तसेच परिसरातील विविध धार्मिक, सामाजिक संघटनांनी परिश्रम घेतले. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. गुरुद्वारा परिसर भगव्या पताका, झेंड्यांनी भगवामय झाला होता.

## आजी-आजोबांनी लावली नवसाक्षरता परीक्षेला हजेरी - जेजुरीत प्रेरणादायी चित्र

जेजुरी (दै. संध्या)



■ ९१ वर्षीय सदाशिव कोंडीबा साळवे व ७५ वर्षीय विमल मारुती शिंदे यांनी आत्मविश्वासाने दिली परीक्षा

"शिकण्याला वयाची अट नसते" याची जिवंत उदाहरणे रविवारी जेजुरी येथे पाहायला मिळाली. नवभारत साक्षरता अभियानांतर्गत आयोजित परीक्षेत जिजामाता प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या केंद्रावर ज्येष्ठ नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेत विद्यार्थ्यांची भूमिका निभावली.

या केंद्रावर ९१ वर्षीय सदाशिव कोंडीबा साळवे (रा. लवथळेश्वर, जेजुरी) तसेच ७५ वर्षीय विमल मारुती शिंदे (रा. जेजुरी) यांनी आत्मविश्वासाने परीक्षा दिली. आयुष्याच्या या टप्प्यावरही शिक्षणाची ओढ कायम असल्याचे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. विद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार सागर, शाळा समन्वयक प्रल्हाद गिरमे आणि प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका गायत्री बेलसरे यांनी या दोघांचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या. शिक्षक कुलदीप साळवे आणि शोभा पठारे यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी सांभाळली. महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालनालयाच्या मार्गदर्शनाखाली आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने नवभारत साक्षरता अभियान राबवले जात आहे. १५ वर्षांवरील प्रत्येक नागरिक साक्षर व्हावा, हा या उपक्रमाचा उद्देश असून २०३० पर्यंत हे लक्ष्य पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. या परीक्षेत पायाभूत साक्षरता, अंकज्ञान आणि मूल्यमापनाचा समावेश होता. परीक्षेसाठी तीन तासांचा कालावधी देण्यात आला होता. "या वयातही शिकण्याची इच्छा पूर्ण करताना खूप आनंद होत आहे. आता मला अंक मोजता येतात आणि थोडेफार वाचनही करता येते," अशी भावना साळवे यांनी व्यक्त केली. पुरंदर तालुक्यातील विविध केंद्रांवर एकूण ५२ जणांनी परीक्षा दिली. पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी गोविंद लाखे यांनी सांगितले की, या उपक्रमासाठी शिक्षक व स्वयंसेवकांचे मोठे योगदान लाभले आहे. शिक्षणापासून वंचित राहिलेल्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा उपक्रम दरवर्षी राबवला जात असून, पुढील काळात तो अधिक व्यापक करण्यावर भर दिला जाणार आहे. परीक्षेचे नियोजन पर्यवेक्षिका लीना पायगुडे, माध्यमिक विभाग प्रमुख बाळासाहेब जगताप,सोमनाथ उबाळे,साबळे छाया, शिंदे सुनीता,गावडे ज्योती, भोंगळे सुनंदा , भुजबळ रसिका, कांबळे अमृता, गोडसे शकुंतला, धुमाळ पौर्णिमा, भगत सुनील, पाटोळे शिल्पा, निगडे मोनिका यांनी केले.



## चाकणला विजेच्या कडकडाटासह

# मुसळधार पाऊस

चाकण (दै. संध्या)

**उकाड्यातून दिलासा, शेतकरी चिंतेत**

दिवसभर वाढलेल्या उकाड्यानंतर सोमवारी दुपारनंतर अचानक विजेच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने चाकणला झोडपून काढले. दुपारी चारनंतर वातावरणात अचानक बदल होत पावसाने जोर धरला. या अनपेक्षित पावसामुळे नागरिकांची एकच धावपळ उडाली.

गेल्या महिनाभरापासून वाढत्या तापमानामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना या पावसाने काहीसा दिलासा दिला. अंगाची लाहीलाही करणाऱ्या उष्णतेत हा पाऊस दिलासादायक ठरला. मात्र, दुसरीकडे शेतकऱ्यांसाठी ही चिंतेची बाब ठरत आहे. कांदा व गहू यांसारखी पिके सध्या काढणीच्या टप्प्यात असल्याने या पावसाचा फटका बसण्याची शक्यता आहे.

अचानक कोसळलेल्या पावसामुळे वीटभट्ट्यांवर काम करणाऱ्यांची तारांबळ उडाली. वीटा भिजू नयेत म्हणून त्या झाकण्यासाठी कामगारांची धावपळ सुरू होती. तसेच चाकण बाजारात विक्रीसाठी आलेला कांदा शेडअभावी बाहेर ठेवण्यात आल्याने तो भिजला. शेडमध्ये शेतमालाऐवजी अवजड मालवाहू वाहनांची गर्दी असल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागला.

मुसळधार पावसामुळे शहरातील वीज पुरवठाही काही काळासाठी खंडित झाला. विजांच्या कडकडाटासह झालेल्या या पावसाने नागरिकांना उकाड्यातून दिलासा दिला असला तरी शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ केली आहे.

## ग्राहक हा अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू बाळासाहेब औटी

नारायणगाव (दै. संध्या)



अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,महाराष्ट्र शासन तहसील कार्यालय जुन्नर यांच्या विद्यमाने जागतिक ग्राहक दिनाचे औचित्य साधून जयहिंद कॉलेज ऑफ इंजीनियरिंग कुरण येथे ग्राहक प्रबोधन कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे मध्य महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष बाळासाहेब औटी यांच्या हस्ते संपन्न झाले.अध्यक्षस्थान जयहिंद शैक्षणिक संकुलच्या संचालिका डॉ.शुभांगी गुंजाळ यांनी भूषवले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे मध्यस्थ अशोक भोर, वैद्य व मापन शास्त्र विभागाचे निरीक्षक राजेश बोरबळकर, दुय्यम निबंधक नारायणगाव अर्चना पाकळे, दुय्यम निबंधक जुन्नर श्रीमती संचिता सांगडे, अन्न व भेसळ निरीक्षक संतोष सावंत, जय हिंद कॉलेज ऑफ इंजीनियरिंगचे प्राचार्य ए.बी. उबाळे, ग्राहक पंचायतीचे जुन्नर तालुकाध्यक्ष जगन्नाथ खोकराळे, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद सदस्या वैशाली अडसरे, जुन्नर तालुका उपाध्यक्ष देवराम तट, तालुका कृषी अधिकारी ज्योतीराम जाधव, जय हिंद शैक्षणिक संकुलाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. दत्तात्रय गल्हे, कोषाध्यक्ष संतोष नेहरकर, कौशल्या ताई,नंदाराम भोर,ग्राहक राजा संघटना विलास वामन उपस्थित होते. यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे मध्य महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष बाळासाहेब औटी यांनी स्पष्ट केले की, ग्राहक हा अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू असून त्याचे सशक्तिकरण अत्यंत आवश्यक आहे.
बदलत्या बाजारपेठेत वाढत्या फसवणुकीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांनी सतर्क राहणे गरजेचे आहे. असे आवाहन केले. कार्यक्रमाचे स्वागत ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले. प्रास्ताविक वैशाली अडसरे यांनी,तर सूत्रसंचालन गाडेकर यांनी केले व आभार प्राचार्य सुभाष आंद्रे यांनी मानले.

## चार विषय समित्यांसाठी जिल्ह्यात मोठी फिल्डींग!

उरुळी कांचन (दै. संध्या)

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पश्चात पुणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष निवड प्रक्रियेत सर्व अधिकार आपल्याकडे ठेवलेल्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व राज्यसभेचे खासदार पार्थ पवार यांच्या नेतृत्वात होत असलेल्या पुणे जिल्हा परिषदेच्या चार विषय समित्यांच्या निवड प्रक्रियेकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले असून, पुणे जिल्हा परिषदेच्या १५ इच्छुकांनी जोरदार फिल्डिंग लावली आहे. आता सभापतीपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याकडे जिल्ह्याचे लक्ष या निवडीकडे लागले आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या बांधकाम, पशू-संवर्धन, महिला बालकल्याण व समाजकल्याण सभापतींसाठी येत्या गुरुवारी (दि. २) रोजी निवड होणार आहे. हवेलीचे उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने यांच्या अध्यक्षतेखाली हा निवडणूक कार्यक्रम होणार आहे. अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची बिनविरोध निवड पाहता या विषय समित्यांवर निवड बिनविरोध अपेक्षित आहे. या सर्व विषय समित्यांवर मात्र राष्ट्रवादीचे १५ जिल्हा परिषद सदस्यांनी तीव्र इच्छा दर्शवल्याने त्यांनी मुंबईत देवगिरी निवास स्थानावर भेटीगाठीचे सत्र सुरू केले आहे.जिल्ह्यातील अडीच लोकसभा व दहा विधानसभा तसेच जातीय समिकरणांवर राष्ट्रवादीकडून या निवडी केल्या जाणार आहेत. पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद बारामती तर उपाध्यक्ष शिरुर लोकसभेसाठी गेल्याने उर्वरीत विधानसभा मतदारसंघ निहाय या निवडी होण्याचे संकेत आहेत.

## नायगाव विकास सोसायटीत कर्जभरण्यासाठी शेतकऱ्यांची गर्दी

■ ३१ मार्चपूर्वी भरणा केल्यास व्याजात सूट

पुरंदर (दै. संध्या)



पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील नायगाव विकास सोसायटी तसेच पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सध्या पीक कर्ज भरण्यासाठी शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे.

दिनांक ३१ मार्च २०२६ पूर्वी नियमित कर्जफेड केल्यास तीन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावर व्याज आकारले जाणार नाही. त्यामुळे मुदतीत कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना १०० टक्के व्याजमाफीचा लाभ मिळणार आहे.

या योजनेमुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळत असून, आगामी हंगामासाठी नव्याने पीक कर्ज घेण्याचा मार्गही सुकर होणार आहे. गेल्या काही दिवसांपासून सोसायटीच्या कार्यालयात शेतकऱ्यांची मोठी वर्दळ पाहायला मिळत आहे. अनेक सभासद आपले कर्ज नियमित करण्यासाठी पुढाकार घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे. सवलतीचा लाभ घेण्यासाठी शेतकरी वर्गात जागरूकता वाढली असून, वेळेत कर्जफेड करण्याकडे त्यांचा कल वाढत आहे.

> शेतकऱ्यांनी आपले कर्ज वेळेत भरून व्याजमाफीचा लाभ घ्यावा. ही सुवर्णसंधी गमावू नये. यामुळे केवळ शेतकऱ्यांनाच नव्हे, तर सोसायटीच्या आर्थिक व्यवस्थेलाही बळकटी मिळेल. नियमित कर्जफेडीमुळे सोसायटीची पत वाढेल आणि भविष्यात अधिक सक्षमपणे काम करता येईल.
> **- चंद्रकांत चौंडकर, चेअरमन, नायगाव विविध कार्यकारी सोसायटी, ता. पुरंदर**

## थोडक्यात पण महत्वाचे...

### शैला जगदाळे यांचे निधन



चाकण(दैनिक संध्या) : चाकण येथील सामाजिक व महिला कार्यकर्त्या सौ. शैला रामचंद्र जगदाळे (वय ६६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सून, नातवंडे, जावई तसेच एक भाऊ असा मोठा परिवार आहे. त्या पत्रकार योगेश गायकवाड यांच्या सासू तर प्रा. शितल गायकवाड यांच्या मातोश्री होत.

### सुरा व तलवारीसह एकास अटक

चाकण (दैनिक संध्या) : सुरा व तलवारीसह बेकायदा शस्त्रे घेऊन फिरणाऱ्या शेलपिंपळगाव नजीकच्या मोहितेवाडी येथील एका पंचेचाळीस तरुणाला अटक करण्यात आली. शरद परशुराम पोतले (वय - ४५, रा. मोहितेवाडी, शेलपिंपळगाव, ता. खेड) असे अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. अधिक माहिती अशी की, शरद हा मोहितेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या पाठीमागे तलवारी व सुरा घेऊन मोकाट फिरत होता. गुन्हे प्रतिबंधक पोलिसांची गस्त सुरू असताना पोलीस पथकाला एका गुप्त खबऱ्याकडून माहिती मिळाली. पोलिसांनी तातडीने संबंधित ठिकाणी सापळा रचून शरद याला ताब्यात घेऊन अटक केली. त्याच्याकडून दोन तलवारी आणि दोन सुरे असा एकूण २,८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चाकण उत्तर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरू आहे.

### ऋतू बदलाचा चाकणकरांना प्रचंड ताप

चाकण (दैनिक संध्या) : तापमानातील तीव्र चढ उतार, कधी सकाळचा गारवा तर कधी उकाडा, मध्येच पडणारा अवकाळी पाऊस, वातावरणातील या बदलामुळे नागरिकांना सध्या सर्दी, खोकला आणि ताप यासारखे लक्षणे दिसून येत आहेत. वाढते प्रदूषण, धूळ यामुळे ही श्वसन मार्गावर परिणाम होत असून, एलर्जीमुळे खोकला वाढला आहे. इतकेच नव्हे तर तो लवकर बराही होत नाही. मोठ्यांसह लहान मुलांमध्येही याचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. गेल्या तीन महिन्यापासून चाकण परिसरात उन्हाचा कडाका जाणवू लागला आहे. कधी थंडी, कधी ऊन, तर कधी गारवा जाणवतो. ऋतू बदलाचा व संक्रमणाचा काळ सध्या सुरू आहे. हे वातावरण सध्या विषाणूंना पोषक ठरत आहे. काही लोकांना धूळ, परागकण किंवा इतर गोष्टींचे वावडे असते. त्यामुळे खोकला येण्याचे प्रमाण वाढले आहे. काही वेळा दम्यासारख्या आजारांमुळे देखील खोकला येत असल्याचे येथील अरगडे हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ.असित अरगडे यांनी सांगितले. हवामानातील बदलाने हंगामी आधार एलर्जी यांचे प्रमाण वाढले आहे. महिला व मुलांमध्ये तापाचे प्रमाणही वाढले आहे. घरातील कोणी आजारी पडू नयेत व त्यांची प्रतिकारशक्ती वाढावी यासाठी त्यांचे लसीकरण करण्याची गरज आहे. खूप दिवसांपासून खोकला बरा होत नसेल व श्वास घेण्यास त्रास होत असेल अथवा छातीत दुखत असेल किंवा कफातून रक्त येत असेल तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

### आंबा, गहू, कांदा पिकांचे मोठे नुकसान, तातडीने पंचनाम्याची मागणी

जुन्नर (दैनिक संध्या) : जुन्नर शहरासह मीना नदीच्या खोऱ्यात वादळी वाऱ्यासह गारपीट व अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची धांदल उडाली. या गारपिटीने शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जवळपास एक तासाहून झालेल्या या पावसाने आंबा, गहू व कांदा पिकाचे मोठे नुकसान झाले असून तातडीने पंचनामे करण्याची मागणी सरपंच अमोल भुजबळ, कुलदीप नायकोडी यांसह शेतकऱ्यांकडून केली जात आहे. जुन्नर तालुक्यातील आंब्याचे आगार म्हणून ओळख असलेल्या काले, येणेरे, बेलसर, वडज , दातखिळेवाडी, पारुंडे, कुसूर, चिंचोली या परिसरात झालेल्या गारपिटीमुळे तसेच वादळामुळे आंबा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यामुळे कैऱ्या मोठ्या प्रमाणात पडल्याचे दिसून आले. यावर्षी डिसेंबर महिन्यामध्ये आंब्याला मोठ्या प्रमाणावर मोहोर आला होता. आंब्याच्या उत्पादनात भरघोस वाढ होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र जानेवारी महिन्यात वातावरणात झालेल्या बदलामुळे आंब्याचा मोहोर गळून पडला.

## तलवारी बाळगणाऱ्यास नारायणगाव पोलीस स्टेशनने केली अटक




नारायणगाव (दै. संध्या)

पुणे ग्रामीण जिल्ह्याच्या हद्दीमध्ये बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्या इसमांना अटक करून कारवाई करण्याच्या सूचना माननीय पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद शिरसागर यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखा जुन्नर विभागाचे पथक नारायणगाव पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करत असताना सहायक फौजदार दीपक साबळे यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की सालीम साजिद पठाण (वय २० रा.शिपाई मोहल्ला,जुन्नर) हा त्याच्या ताब्यातील सुझुकी कंपनीची एस्टीम गाडी घेऊन नारायणगाव येथे येणार असून त्या गाडीत तलवारी आहेत. मिळालेल्या बातमीवरून गुन्हे शाखा पथक तसेच नारायणगाव पोलीस स्टेशनकडील पथकाने सदर ठिकाणी जाऊन सालीम साजिद पठाण (रा.शिपाई मोहल्ला जुन्नर) यास ताब्यात घेऊन त्याच्या गाडीची झडती घेतली असता त्याच्या गाडीमध्ये दहा मोठ्या तलवारी तसेच दोन लहान तलवारी मिळून आल्या. नारायणगाव पोलीस स्टेशनने गुन्हा दाखल केला असू त्यांच्याकडून वापरण्यात आलेली गाडी व 12 तलवारी जप्त केल्या आहेत. पुढील तपास नारायणगाव पोलीस स्टेशनचे पोलीस सबइन्स्पेक्टर जगदेव पाटील करीत आहे.

## आंबेगाव सुपर २३ विद्यार्थ्यांची मुंबई विज्ञान सफर

घोडेगाव (दै. संध्या)

पंचायत समिती आंबेगाव शिक्षण विभाग, आयुका वेधशाळा गिरवली व आयुका पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने, मोरडे फुड्स प्रा. ली. मंचर यांच्या सहकार्याने आंबेगाव सुपर 23 उपक्रमातील यशस्वी 23 विद्यार्थी व त्यांचे मार्गदर्शक शिक्षक यांची वैज्ञानिक सहल मुंबई येथे नेण्यात आली होती. विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा. त्यांच्यातील जिज्ञासू, तसेच चौकस वृत्तीला आणि कल्पकतेला वाव मिळावा हा या उपक्रमाचा उद्देश होता. पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, शिक्षण अधिकारी संजय नाईकडे , गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वैज्ञानिक शैक्षणिक सहलीच्या पहिल्या दिवशी होमी भाभा विज्ञान केंद्र, मुंबई येथे संस्थेचे संचालक शास्त्रज्ञ डॉ. अर्नब भट्टाचार्य यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

## शिर्डीत पत्रकार धम्मशील सावंत नानक साई अवॉर्डने सन्मानित

रायगड (दै. संध्या)



> या पुरस्कार सोहळ्यास शिर्डीच्या नगर अध्यक्षा सौ जयश्री थोरात, शिर्डी संस्थान चे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, शिर्डीचे प्रथम नगरअध्यक्ष काकासाहेब कोते, माजी उपनगर अध्यक्ष विजय भाऊ कोते, नानक साई फाऊंडेशनचे प्रमुख पंढरीनाथ बोकारे, सुरेश वाबळे, साईभक्त दिलीप कंदकुर्ते, राजकुमार चौगुले, नामदेव कुंभार, पंढरीनाथ पगार, सुनील निकम, सरदार प्रितम सिंघ भाटिया, साईप्रसाद खांडरे, सौ प्रफुल्ला बोकारे, पंकज लोढा, संजय कदम रुईकर, धनंजय उमरीकर, विनायक भोसले, प्रभाकर केसरकर, नागेश वायदंडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

शिर्डीच्या भूमीत राज्यातील विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान मान्यवरांना गौरविण्यात आले ही बाब कौतुकास्पद आहे. स्वराज्य व क्रांतीभूमी असलेल्या रायगडातील निर्भीड पत्रकार धम्मशील सावंत हे सर्वसामान्य जनतेचा बुलंद आवाज असून त्यांच्या आजवरच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना नानक साई अवॉर्ड 2026 पुरस्काराने गौरविल्याने येत्या काळात त्यांना अधिक बळ व प्रोत्साहन मिळेल असे प्रतिपादन भूमाता ब्रिगेड च्या प्रमुख तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी केले.

नानक साई फाऊंडेशन या संस्थेतर्फे शिर्डी येथे विशाल साई भक्त संमेलन आयोजित करण्यात आले होते.नानक साई फाऊंडेशन तर्फे शिर्डीत ७ व्या 'नानक साई पुरस्कार' सोहळ्याचे आयोजन केले होते.या संमेलना चे उद्घाटन साईबाबा शिर्डी संस्थान मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात कला, संस्कृती, समाजसेवा, अध्यात्म आणि पत्रकारिता या क्षेत्रांतील उत्कृष्ट कार्यासाठी व्यक्ती आणि संस्थांचा नानक साई अवॉर्ड देऊन सन्मान केला.

धम्मशील सावंत यांनी त्यांच्या पत्रकारितेत कोकणातील स्थानिक, प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांच्या मूलभूत प्रश्नांना चव्हाट्यावर आणलं. प्रतिकूल संसाधनांमध्ये धम्मशील सावंत यांनी कोकणातील महत्वाचे प्रश्न मांडले. कोकणची अस्मिता अधिक टोकदार केली. प्रसंगी धनदांडग्यांना शिंगावर घेण्याचे काम केले. भांडवलदार आणि गरीब असा संघर्ष जेंव्हा उभा राहतो तेंव्हा धम्मशील सावंत एका क्षणात गरिबांच्या बाजूने उभे राहत धनदांडयांना आपल्या शिंगावर घेतात.

त्यांनी आजपर्यंत कोकणातील आदिवासी जनतेच्या मूलभूत समस्या, मच्छीमारांचे ज्वलंत प्रश्न, मिठागर व्यावसायिकांच्या समस्या, आंबा बागायतदार,कोकणातील शेतीला धोक्यात आणणारा बांध बंदिस्तीचा मूलभूत प्रश्न, आरोग्याचे मूलभूत प्रश्न, मुंबई गोवा महामार्गाचा प्रश्न, शहरातील महिला भाजी विक्रेत्यांच्या समस्या असे अनेक प्रश्न मुख्य पटलावर आणले. निवडणूक काळात केवळ राजकीय नेत्यांच्याच मुलाखती न घेता त्यांनी सर्वसामान्यांच्या प्रश्नांची सखोल चर्चा घडवून आणली.त्यांनी अनेक आघाडीच्या माध्यमांमध्ये काम केले आहे. त्यांनी महाराष्ट्रामध्ये आपला वेगळा ठसा उमटवला आहे. केवळ पत्रकारिता क्षेत्रात मर्यादित न राहता त्यांनी सामाजिक क्षेत्रात देखील भरीव योगदान दिले आहे. अनेक आंदोलनांमध्ये सहभाग घेतला आहे. अनेक स्थानिक भूमिपुत्रांना न्याय मिळवून दिला आहे. धम्मशील सावंत या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाला त्यांनी पत्रकारिता क्षेत्रात दिलेल्या योगदानाबाबत शिर्डीत नानक साई फाऊंडेशन पुरस्कार 2026 या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

# डिजिटल परिवर्तनामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याकडून अभिनंदन



**महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभागाने (पीडब्ल्यूडी) १५० दिवसाच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत प्रशासनाच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणत डिजिटल परिवर्तनाचा नवा आदर्श निर्माण केला आहे. ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांमुळे विभागाच्या कामकाजात पारदर्शकता, वेग आणि उत्तरदायित्व वाढले असून नागरिकांना थेट आणि जलद सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष म्हणजे, या कालावधीत ९९ टक्के तक्रारींचे यशस्वी निराकरण करण्यात विभागाला यश आले असून, हे प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे द्योतक मानले जात आहे.**

> “या १५० दिवस ई गव्हर्नन्स उपक्रमात आम्ही केवळ तांत्रिक बदल केले नाहीत, तर कार्यपद्धतीतही मूलभूत सुधारणा केल्या आहेत. ई ऑफिस, आपले सरकार पोर्टल, एआय-आधारित प्रणाली आणि डेटा ॲनालिटिक्स यांचा समन्वय साधत सेवा वितरण अधिक कार्यक्षम करण्यात आले आहे. दैनंदिन देखरेख, संरचित आढावे आणि प्रक्रियेचे सुलभीकरण यामुळे निर्णय प्रक्रियेला गती मिळाली आहे. या उपक्रमांमुळे प्रशासन अधिक पारदर्शक, उत्तरदायी आणि परिणामकारक झाले असून, नागरिकांना त्याचा थेट लाभ होत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा अजित पवार तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली १५० दिवसांच्या ई गव्हर्नन्स उपक्रमातून सार्वजनिक बांधकाम विभागाने डिजिटल परिवर्तन प्रभावीपणे राबवले आहे.”
> **– मनिषा म्हैसकर, तत्कालीन अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग**

> “सार्वजनिक बांधकाम विभागाने गेल्या १५० दिवसांत राबविलेल्या ई-गव्हर्नन्स सुधारणा उपक्रमांमुळे प्रशासनात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. नागरिकांना जलद, पारदर्शक आणि दर्जेदार सेवा देणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट असून, त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला जात आहे. तक्रार निवारणात ९९ टक्के यश, सेवा वितरणातील वेग आणि डिजिटल प्रणालींचा व्यापक वापर यामुळे नागरिकांचा शासनावर विश्वास अधिक दृढ झाला आहे. पुढील काळातही ‘नागरिक प्रथम’ या तत्त्वावर काम करत विभागाला अधिक सक्षम आणि लोकाभिमुख बनविण्याचा आमचा प्रयत्न राहील.”
> **– शिवेंद्रसिंह राजे भोसले, मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन**

राज्य शासनाच्या १५० दिवस ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात सार्वजनिक बांधकाम विभागाने उल्लेखनीय कामगिरी करत १८६.७५ गुण मिळवित सर्वोत्तम मंत्रालयीन विभागात राज्यात प्रथम स्थान पटकाविले आहे. या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तत्कालीन अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर आणि विद्यमान अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

विभागाच्या या व्यापक परिवर्तनाचा केंद्रबिंदू ठरलेला घटक म्हणजे विभागाचे अद्ययावत आणि नागरिकाभिमुख संकेतस्थळ. १९९५ साली सुरू झालेले संकेतस्थळ आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने पूर्णपणे नव्याने विकसित करण्यात आले आहे. एस३डब्ल्यूएएस (सिक्युअर स्केलेबल अँड सुगम्य वेबसाईट ॲज अ सर्व्हिस) या प्रणालीवर आधारित हे संकेतस्थळ अधिक सुरक्षित, वापरण्यास सुलभ आणि सर्वसमावेशक आहे. संकेतस्थळावर डब्ल्यूसीएजी २.२ आयएएपी प्रमाणित सुलभता साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. यामध्ये अक्षरांचा आकार बदलणे, उच्च कॉन्ट्रास्ट मोड, टेक्स्ट-टू-स्पीच सुविधा, आवाजावर आधारित शोध आणि बहुभाषिक भाषांतर यांसारख्या सुविधा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील नागरिकांनाही सहजपणे माहिती मिळू लागली आहे.

संकेतस्थळाच्या वापरात झालेली वाढ ही या बदलाची साक्ष देते. संकेतस्थळ सुरू झाल्यापासून लाखो नागरिकांनी त्याचा वापर केला असून, पहिल्या ३० दिवसातच दहा लाखांहून अधिक सक्रिय वापरकर्ते नोंदवले गेले आहेत. सरासरी सहा मिनिटांपेक्षा जास्त कालावधी वापरकर्ते संकेतस्थळावर घालवत असल्याने माहितीची उपयुक्तता आणि सुलभता स्पष्ट होते. तसेच, ‘बाउन्स रेट’ कमी असल्याने वापरकर्ते दीर्घकाळ संकेतस्थळावर टिकून राहत असल्याचे दिसून येते.

‘आपले सरकार’ पोर्टलशी एकत्रीकरण हा विभागाच्या कामकाजातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. लोकसेवा हक्क अधिनियमाअंतर्गत अधिसूचित केलेल्या आठही सेवा पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आल्या असून, नागरिकांना आता अर्ज, मंजुरी, प्रमाणपत्रे यासाठी कार्यालयात जाण्याची आवश्यकता उरलेली नाही. या प्रक्रियेमुळे सेवा वितरणाचा कालावधी लक्षणीयरित्या कमी झाला आहे. पूर्वी सरासरी ३२ दिवस लागणारी प्रक्रिया आता केवळ २० दिवसांत पूर्ण होत आहे. याचबरोबर सेवास्तर पालनातही मोठी सुधारणा झाली असून ते ९० टक्क्यांवरून १३८ टक्क्यांपर्यंत वाढले आहे.

तक्रार निवारण प्रणालीत झालेली सुधारणा ही या मोहिमेची सर्वात मोठी यशोगाथा ठरते. दैनंदिन देखरेख, संरचित आढावे आणि वेळेवर तक्रारींचे निवारण यामुळे तक्रार निवारणाचे प्रमाण ८० टक्क्यांवरून ९९ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. एस्कलेशनचे प्रमाण १२ टक्क्यांवरून केवळ ०.०९ टक्क्यांपर्यंत घटले आहे, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. सार्वजनिक विभागाने १,२४८ तक्रारींचे विश्लेषण करून त्यातील सुमारे ३९.५ टक्के तक्रारी रस्त्यांच्या देखभाल आणि गुणवत्तेशी संबंधित असल्याचे ओळखले. या विश्लेषणाच्या आधारे आवश्यक उपाययोजना राबविण्यात आल्या असून, विशेषतः पावसाळ्यात उद्भवणाऱ्या समस्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

बांधकाम विभागाच्या अंतर्गत कामकाजातही डिजिटल प्रणालींचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाला आहे. ई-ऑफिस प्रणालीमुळे सर्व अधिकारी डिजिटल पद्धतीने काम करत असून, फाईल हालचालीचे रिअल-टाइम निरीक्षण शक्य झाले आहे. यामुळे निर्णय प्रक्रियेला गती मिळाली असून विलंबात लक्षणीय घट झाली आहे. गव्हर्नमेंट प्रोसेस रि-इंजीनियरिंग (जीपीआर) च्या माध्यमातून ६४३ प्रक्रियांचे विश्लेषण करून कार्यपद्धती अधिक सुलभ करण्यात आली आहे. फाईल प्रक्रियेतील टप्प्यांची संख्या कमी करून कामकाज अधिक परिणामकारक करण्यात आले आहे. डॅशबोर्ड आणि डेटा ॲनालिटिक्स प्रणालीमुळे विभागाच्या कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे. सर्व लोकसेवा हक्क अधिनियमातील सेवा एकाच डॅशबोर्डवर उपलब्ध करून देण्यात आल्या असून, त्याद्वारे सेवा वितरणाचे रिअल-टाइम ट्रॅकिंग आणि भविष्यातील अंदाज बांधणे शक्य झाले आहे. मुख्यमंत्री डॅशबोर्डशी एकत्रीकरण केल्यामुळे वरिष्ठ स्तरावरून देखरेख अधिक सक्षम झाली आहे. यामुळे प्रशासनातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढले आहे. नागरिकांशी थेट संवाद साधण्यासाठी व्हॉटसअप आणि चॅटबॉटचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. पीडब्ल्यूडी चॅटबॉटद्वारे नागरिकांना सेवा, अर्ज प्रक्रिया, तक्रार निवारण याबाबत मार्गदर्शन मिळते. तसेच, व्हॉटसअप ब्रॉडकास्टिंगद्वारे हजारो नागरिकांना सेवांबाबत माहिती देण्यात आली आहे. या माध्यमातून नागरिकांचा सहभाग वाढून प्रशासन अधिक लोकाभिमुख बनले आहे. तंत्रज्ञानाच्या वापरात विभागाने कृत्रिम बुद्धिमत्तेचाही प्रभावी अवलंब केला आहे. ‘पॉव्होलगार्ड’ या एआय-आधारित प्रणालीद्वारे रस्त्यांवरील खड्ड्यांची ओळख करून त्यांची तातडीने दुरुस्ती केली जाते. GPS तंत्रज्ञानाच्या साहाय्याने खड्ड्यांचे अचूक स्थान नोंदवले जाते आणि दुरुस्ती झाल्यानंतर त्याची पडताळणीही केली जाते. यामुळे रस्त्यांची गुणवत्ता सुधारून अपघातांची शक्यता कमी झाली आहे.

याशिवाय, विभागाने जेनएआय प्लॅटफॉर्मचा वापर करून धोरणनिर्मिती आणि विश्लेषणातही नवोन्मेष केला आहे. ड्रोन धोरण, रस्ता आखणी आणि पायाभूत प्रकल्पांसाठी निधी उभारणी यासारख्या विषयांवर एआयच्या मदतीने अभ्यास करण्यात आला आहे. यामुळे निर्णय प्रक्रियेत अधिक अचूकता आणि वेग आला आहे.

जीआयएस आणि ‘पीएम गती शक्ती’ पोर्टलच्या माध्यमातून प्रकल्प नियोजन अधिक शास्त्रीय पद्धतीने केले जात आहे. नागपूर-चंद्रपूर द्रुतगती मार्ग प्रकल्पात विविध स्तरांवरील माहितीचा वापर करून जंगल क्षेत्र, वन्यजीव मार्ग आणि खनिज क्षेत्र यांचे अचूक विश्लेषण करण्यात आले. परिणामी, सुमारे २७ हेक्टर जंगल वाचवण्यात यश आले आहे, जे पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरले आहे. वृक्षलागवड उपक्रमातही विभागाने तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आहे. ‘ट्री ॲप’च्या माध्यमातून ८ लाखांहून अधिक झाडांची नोंद आणि देखरेख करण्यात आली आहे. जीपीएस आणि छायाचित्रांच्या साहाय्याने झाडांची स्थिती तपासली जाते आणि त्याच्या वाढीवर लक्ष ठेवले जाते. यामुळे पर्यावरणपूरक विकासाला चालना मिळाली आहे.

या सर्व उपक्रमांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने केवळ प्रशासनिक कार्यक्षमता वाढवली नाही, तर नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा दर्जाही उंचावला आहे. या डिजिटल परिवर्तनामुळे नागरिकांचा शासनावरचा विश्वास अधिक दृढ झाला असून, पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासनाची पायाभरणी झाली आहे. एकूणच, १५० दिवस ई गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत राबविण्यात आलेल्या या उपक्रमांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने राज्यातील इतर विभागांसाठी आदर्श निर्माण केला आहे.



# वन व्यवस्थापनाची वाटचाल डिजिटल दिशेने

■ नंदकुमार बलभीम वाघमारे ■
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

महाराष्ट्र वन विभागाने गेल्या १५० दिवसांत डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत प्रशासनाच्या कार्यपद्धतीत लक्षणीय बदल घडवून आणले आहेत. नागरिकाभिमुख सेवा, पारदर्शकता, तक्रार निवारण, डेटा व्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या सर्व बाबींमध्ये विभागाने उल्लेखनीय कामगिरी करत शासनाच्या ई-गव्हर्नन्स धोरणाला गती दिली आहे. या कालावधीत विभागाने केवळ सेवा वितरण सुधारले नाही, तर पर्यावरण संवर्धन आणि वन व्यवस्थापनातही तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून एक आदर्श निर्माण केला आहे.

राज्य शासनाच्या १५० दिवसाच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात महाराष्ट्र वन विभागाने उल्लेखनीय कामगिरी करत मंत्रालयीन विभागात राज्यात दुसरे स्थान पटकावले. विभागाला २०० पैकी १७१.५ गुण मिळाले असून डिजिटल कारभारात तो अग्रगण्य विभागांपैकी एक ठरला आहे. या यशाबद्दल वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन विशेष गौरव करण्यात आला.

वन विभागाचे संकेतस्थळ हे आधुनिक, सुरक्षित आणि सर्वसमावेशक बनविण्यात आले आहे. संकेतस्थळाचा लोडिंग वेळ पाच सेकंदांपेक्षा कमी ठेवण्यात यश आले असून, मोबाइल, टॅबलेट आणि संगणक या सर्व माध्यमांवर ते सुलभपणे कार्यरत आहे. विविध ब्राउझरवरही ते सुरळीत चालते, ही बाब विशेष महत्त्वाची आहे. संकेतस्थळावर मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे, त्यामुळे सर्व स्तरातील नागरिकांना त्याचा लाभ घेता येतो. संकेतस्थळावर दरमहा सुमारे १.८६ लाख वापरकर्ते भेट देत असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते, ज्यातून त्याची उपयुक्तता अधोरेखित होते.

सुलभता आणि सर्वसमावेशकता यावर विशेष भर देण्यात आला आहे. संकेतस्थळावर स्क्रीन रीडर, टेक्स्ट रिसाइज, कीबोर्ड नेव्हिगेशन यासारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. दिव्यांग नागरिकांसाठीही संकेतस्थळ सहज वापरता येईल, याची काळजी घेण्यात आली आहे. यासोबतच सायबर सुरक्षा आणि प्रमाणपत्रांच्या दृष्टीनेही संकेतस्थळाने उच्च मानके पूर्ण केली आहेत. सर्ट-इन मान्यताप्राप्त सायबर सुरक्षा तपासणी आणि जीआयजीडब्ल्यू मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यात आले आहे, ज्यामुळे नागरिकांचा विश्वास वाढला आहे.

वन विभागाच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी संकेतस्थळावर ‘सिटिझन चार्टर’, आरटीआय विभाग, ‘व्हॉट्स न्यू’ सेक्शन आणि विविध शासकीय निर्णयांची माहिती नियमितपणे अद्ययावत करण्यात येते. नागरिकांना आवश्यक माहिती सहज मिळावी यासाठी सर्च सुविधा, व्हॉइस-टू-टेक्स्ट शोध आणि साइटमॅप यासारख्या सुविधा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना माहिती शोधणे अधिक सोपे झाले आहे.

सेवा वितरणाच्या बाबतीत वन विभागाने मोठी झेप घेतली आहे. विभागाकडून एकूण ३२ सेवा उपलब्ध करून देण्यात येतात, त्यापैकी १३ सेवा लोकसेवा हक्क अधिनियमनाअंतर्गत अधिसूचित असून त्या सर्व ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध आहेत. ‘आपले सरकार’ पोर्टलशी एकत्रीकरण केल्यामुळे नागरिकांना घरबसल्या अर्ज करणे, त्याची स्थिती तपासणे आणि सेवा मिळवणे शक्य झाले आहे. या सेवांमध्ये तेंदू व्यापारी नोंदणी, वन्यजीवांमुळे झालेल्या नुकसानीसाठी भरपाई, सॉ मिल परवाना नूतनीकरण, संरक्षित क्षेत्रात छायाचित्रण परवानगी यासारख्या महत्त्वाच्या सेवांचा समावेश आहे.

या कालावधीत वन विभागाकडून सुमारे १.६३ लाख अर्जांची यशस्वी पूर्तता करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, नागरिकांकडून पहिल्या किंवा दुसऱ्या स्तरावरील अपिलांची संख्या शून्य असल्याचे दिसून येते, यावरून सेवा वितरणातील कार्यक्षमता स्पष्ट होते. याशिवाय, ८९७ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून, सर्व कर्मचाऱ्यांनी डिजिटल प्रणाली आत्मसात केल्याचे दिसून येते.

तक्रार निवारण व्यवस्थेतही वन विभागाने प्रभावी कामगिरी केली आहे. जवळपास ९९८ तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून, त्यापैकी अनेक तक्रारींचे वेळेत निवारण करण्यात आले आहे. एस्कलेशनची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे नागरिकांना तक्रारींचा पाठपुरावा करणे सोपे झाले आहे. तक्रार निवारणानंतर नागरिकांकडून मिळालेला सरासरी अभिप्राय ८.७१ इतका असून, यावरून नागरिकांचे समाधान दिसून येते.

वन विभागाने डेटा ॲनालिटिक्सचा प्रभावी वापर करून निर्णय प्रक्रियेला गती दिली आहे. रेट्रोस्पेक्टिव्ह, इन्फरेंशियल आणि प्रेडिक्टिव्ह ॲनालिटिक्सचा वापर करून तक्रारींचे विश्लेषण करण्यात येते आणि त्यानुसार धोरणात्मक निर्णय घेतले जातात. यामुळे समस्यांचे मूळ कारण ओळखून त्यावर दीर्घकालीन उपाययोजना करता येतात.

ई ऑफिस प्रणालीमुळे विभागाच्या अंतर्गत कामकाजात मोठी सुधारणा झाली आहे. ई ऑफिसद्वारे १४,५५३ फाईल्स तयार करण्यात आल्या असून, त्यापैकी ४,०६३ फाईल्स निकाली काढण्यात आल्या आहेत. फाईल प्रक्रियेतील टप्प्यांची संख्या चारवरून तीनपर्यंत कमी करण्यात आली आहे, ज्यामुळे निर्णय प्रक्रियेला वेग आला आहे. डिजिटल पद्धतीने फाईल व्यवस्थापन केल्यामुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढली आहे.

डॅशबोर्ड प्रणालीमुळे विभागाच्या कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे. विविध योजनांची प्रगती, वृक्षलागवड, बांबू मिशन आणि राज्यस्तरीय प्रकल्पांचे निरीक्षण एका ठिकाणी करता येते. मुख्यमंत्री डॅशबोर्डशी एकत्रीकरण केल्यामुळे वरिष्ठ स्तरावरून देखरेख सुलभ झाली आहे.

नागरिकांशी संवाद साधण्यासाठी व्हॉट्सॲप चॅटबॉटचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये कार्यरत असलेला हा चॅटबॉट केवळ तीन टप्प्यांत नागरिकांना आवश्यक माहिती उपलब्ध करून देतो. विविध योजनांबाबत जनजागृती करण्यासाठी या माध्यमाचा उपयोग करण्यात आला आहे.

वन व्यवस्थापनातही तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित बिबट्या ट्रॅकिंग, ताडोबा येथे व्हर्च्युअल वॉल, आग शोध प्रणाली आणि मार्व्हल यासारख्या उपक्रमांमुळे वन्यजीव संरक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम झाले आहे. जीआयएस प्रणालीच्या वापरामुळे वनक्षेत्राचे अचूक मॅपिंग आणि नियोजन करता येत आहे.


> “वन विभागाने ई गव्हर्नन्स सुधारणा उपक्रमाअंतर्गत राबविलेल्या डिजिटल उपक्रमांमुळे प्रशासनात केवळ तांत्रिक बदल झाले नाहीत, तर कार्यपद्धतीतही आमूलाग्र सुधारणा घडून आली आहे. यामुळे नागरिकांना सेवा मिळण्याची प्रक्रिया अधिक सोपी आणि वेगवान झाली आहे. वन्यजीव संरक्षणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणाली, जीआयएस तंत्रज्ञान आणि डेटा ॲनालिटिक्सचा वापर करून आम्ही निर्णय प्रक्रियेला अधिक शास्त्रीय आधार दिला आहे. या सर्व उपक्रमांचा थेट लाभ नागरिकांना मिळत असून, पारदर्शक आणि जबाबदार प्रशासनाची दिशा अधिक मजबूत होत आहे.”
> **– वनमंत्री गणेश नाईक**

> “ई गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांमध्ये आम्ही ‘डिजिटल फर्स्ट’ या दृष्टीकोनातून काम करत सेवा वितरण, तक्रार निवारण आणि अंतर्गत प्रशासन या तिन्ही स्तरांवर सुधारणा केल्या आहेत. नागरिकांच्या अभिप्रायाचा आणि तक्रारींच्या डेटाचा अभ्यास करून धोरणात्मक निर्णय घेतले जात आहेत. यामुळे केवळ कार्यक्षमता वाढली नाही, तर सेवा अधिक अचूक, पारदर्शक आणि परिणामकारक बनल्या आहेत. आगामी काळातही तंत्रज्ञानाचा अधिक व्यापक वापर करून वन व्यवस्थापन आणि नागरिक सेवा अधिक सक्षम करण्यावर आमचा भर राहील.”
> **– मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव, वन विभाग, महाराष्ट्र शासन**

# स्मार्ट टेक्नॉलॉजी, संवेदनशील प्रशासन

## पुणे जिल्हा परिषदेची नवी ओळख

**पुणे जिल्हा परिषद प्रशासनाने तंत्रज्ञानाच्या जोरावर प्रशासनाची कार्यपद्धतीच बदलून टाकली आहे. डिजिटल उपक्रम, एआय, जीआयएस आणि ऑनलाइन सेवांच्या माध्यमातून नागरिकांना जलद, पारदर्शक आणि सुलभ सेवा देत एक नवा आदर्श निर्माण केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरविण्यात आलेल्या या यशामागील नेमके काय आहे, याची उत्सुकता वाढवणारा प्रवास या लेखातून उलगडतो...!!**



संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, पुणे

पुणे जिल्हा परिषद प्रशासनाने गेल्या वर्षभरात नागरिकांना जलद, पारदर्शक आणि सुलभ सेवा देण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर सुरू केला आहे. डिजिटल युगाशी सुसंगत पद्धती स्वीकारून प्रशासनाने पारंपरिक कामकाजात मोठे बदल घडवून आणले आहेत.नागरिकांना शासकीय कार्यालयात वारंवार जाण्याची गरज कमी झाली आहे.

ई-गव्हर्नन्सचा वाढता वापर करण्यासोबतच डिजिटल रेकॉर्ड व ऑनलाइन सेवा देण्यावर भर देण्यात येत आले. ग्रामपंचायतींमध्ये संगणक, इंटरनेट सुविधा आणि ऑनलाइन पोर्टलचा वापर तसेच नागरिकांच्या तक्रारी आणि सूचना नोंदवण्यासाठी विविध व्हाट्सअप चॅनल सुरू करण्यात आले आहेत. त्यामुळे तक्रारींचे लवकर निराकरण करणे शक्य झाले आहे. आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील डिजिटल बदल घडवून आणले आहेत. ऑनलाईन प्रणालीमुळे सर्व कामकाजाचा मागोवा घेता येतो. त्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसण्यास मदत झाली असून प्रशासन अधिक कार्यक्षम आणि उत्तरदायी झाले आहे. राज्य शासनच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत झालेल्या मूल्य मापनात पुणे जिल्हा परिषदेला २०० पैकी १९६.२५ गुण प्राप्त करून राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे; सेवाकर्मी कार्यक्रमामध्ये जिल्हा परिषदेची 'प्रथम' क्रमांकाने निवड झाली आहे. आणि मुबंई येथे झालेल्या विशेष सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्हा परिषद पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांना गौरव करण्यात आला. निपुण डॅसबोर्ड: चाचणी डेटाचा वापर करून विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे सर्वांगीण निरीक्षण केले जाते. गट, समूह शाळा, विद्यार्थ्यांच्या पातळीवर कामगिरीचा आढावा घेतला जातो. शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी डेटा आधारित निर्णयांचा आधार घेतला जातो. सविस्तर अहवालांच्या माध्यमातून जबाबदारी आणि पारदर्शकता वाढविण्यावर भर दिला जातो. शिक्षण आणि विद्यार्थ्यांना मदतीसह मार्गदर्शन करण्यास सहाय्य करण्यात येते. मौखिक साक्षरता व अंकगणितीसाठी निपुण भारत आणि महाराष्ट्राच्या उद्दिष्टांसह अलाइन करण्यावर भर दिला जातो. निपुण डॅसबोर्ड अंतर्गत जिल्ह्यातील ३ हजार १२५ शाळेत आयोजित करण्यात आलेल्या चाचणीमध्ये १ लाख १० हजार ८६८ विद्यार्थ्यांनी चाचणी परीक्षा दिली आहे.

क्युआर कोड कर प्रणाली: जिल्ह्यातील १ हजार १०० पेक्षा अधिक ग्रामपंचायतीमध्ये नागरिकांना कर भरण्यासाठी क्युआर कोड आणि युपीआय वापर करण्यात आला आहे, यामुळे नागरिकांना घरबसल्या कर भरता येत आहे.

या प्रणालीमुळे सुमारे ३० टक्के महसुलात वाढ झाली आहे. ब्लॉकचेन मालमत्ता व्यवस्थापन : सर्व १०८ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि २ हजाराहून अधिक १ अंगणवाड्या सेवा त्रिज्येसह नकाशावर दर्शवल्या आहेत आणि लोकसंख्या समूहांशी जोडल्या आहेत.

सर्व जिल्हा परिषद शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि मालमत्तांना त्यांची स्थिती आणि सुविधांच्या माहितीसह जिओ-टॅग केले जात आहे. २० पेक्षा जास्त जीआयएस स्तरांमध्ये पिण्याचे पाणी, शौचालये, रस्ते, सीमांचे आच्छादन, गावे, तालुके इत्यादींचा समावेश आहे.

ग्रामपंचायत नियोजन आणि संसाधन वाटपामध्ये रिअल-टाइम जीआयएस डेटा वापरला जातो. पुनरावलोकन बैठका आणि निधीचा मागोवा घेण्यासाठी परस्परसंवादी नकाशा इंटरफेस वापरला जातो.

जनरेटिव्ह एआयद्वारे जलद, बहुभाषिक आणि पारदर्शक प्रशासन सेवा मसुदा तयार करणे,भाषांतर

२४ x ७ चॅटबॉट सेवा

**डेटा विश्लेषण, अहवाल**

प्रमाणपत्र स्थिती, ॲप्स

दस्तऐवज सारांश सामूहिक संदेशन आणि प्रसारण सादरीकरण, संक्षिप्त माहिती वारंवार विचारले जाणारे प्रश्न आणि मार्गदर्शक म्हणून महत्वाची भूमिका बजावत आहे.

गुगल मॅप्स आणि गुगल अर्थचा वापर करून जलसंपदा व्यवस्थापनाचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे. ३६ जीआयस स्तरांमध्ये १ हजार ५६६ गावांवरील ८०२ लहान सिंचन संरचनांचे मॅपिंग करण्यात आले. जिओ टॅगिंग आणि मालमत्ता पडताळणीसाठी हवाई आणि जमिनीवरील सर्वेक्षण, मालमत्ता दृश्यांकन, पूर आणि दुष्काळ नियोजन व विश्लेषण, सिंचन, जल नियोजन आणि प्रदूषण नियंत्रणासाठी जीआयएस मॅपिंग करुन नवीन संरचनांसाठी निर्णय घेण्यात येते.

स्थळभेटी आणि उपग्रह ओव्हरलेजसह डिजिटल नकाशांची क्रॉस-पडताळणी आणि गतीशक्ती पोर्टलसह द्विदिशात्मक एकात्मिकरण करण्यात येते.

पुणे जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन विभागाने आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रमुख सिंचन संरचनांना लक्ष्य करून, एका डिजिटल मालमत्ता मॅपिंग प्रकल्पाची सुरुवात केली आहे आणि त्याची यशस्वी चाचणीही केली आहे. यामध्ये कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे, साठवण बंधारे, वळण बंधारा, पांझर तलाव, अमृत सरोवर, अटल भूजल योजना आदींचे मॅपिंग करण्यात येते. कृत्रिम बुद्धिमत्तावर आधारित नागरिक इंटरफेस म्हणून नागरिकांशी थेट संवाद वाढवण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेने सुरू केले आहे.

# शेतजमिनींचे रूपांतर बिगरशेती जमिनीत होणे अन्नसुरक्षेसाठी गंभीर

## राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्याकडून शून्य प्रहरात मुद्दा उपस्थित; शेतजमिनींचे संरक्षण करण्याची मागणी

पुणे (दै. संध्या)




देशातील कृषी क्षेत्र झपाट्याने अकृषी क्षेत्रात रूपांतरित होत असून, अन्नसुरक्षेच्या दृष्टीने ही अत्यंत गंभीर बाब आहे. भारतासारख्या कृषीप्रधान देशात शेतीयोग्य जमिनीचे प्रमाण कमी होणे चिंताजनक आहे. १४० कोटी नागरिकांच्या अन्नसुरक्षेसाठी सक्षम असलेल्या भारताला सुरक्षित ठेवायचे, तर शेतजमिनींचे संरक्षण करणे गरजेचे आहे, असे स्पष्ट मत राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी संसदेत शून्य प्रहरात बोलताना मांडले.

प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "देशातील अनेक जिल्हे आणि शहरांमध्ये शेतीजमिनींची प्लॉटिंग करून निवासी प्रकल्प उभारले जात आहेत. यामुळे पेरणीयोग्य क्षेत्रात सतत घट होत आहे. पंजाबमध्ये मागील काही वर्षांत एक लाख हेक्टरपेक्षा अधिक जमीन अकृषिक घोषित करण्यात आली. सध्या भारतात केवळ सुमारे ४५ टक्के जमीनच शेतीखाली असून, त्यात सुमारे ९ टक्क्यांची घट झाली आहे. ही स्थिती कायम राहिल्यास अन्नसुरक्षा, शेतकऱ्यांची उपजीविका, जीएसटी उत्पन्न आणि पर्यावरणीय संतुलन यावर परिणाम होऊ शकतो." एका अभ्यासानुसार लोकसंख्येत एक टक्क्याने वाढ झाली, तर शेती क्षेत्र ०.४५ टक्क्यांनी कमी होते, असे त्यांनी नमूद केले.

शेतकऱ्यांनी आपली शेतजमीन जपून ठेवत पुढील पिढीसाठी ती सुरक्षित करावी. आधुनिक तंत्रज्ञान, गुणवत्तापूर्ण बियाणे, सूक्ष्म सिंचन आणि सरकारी योजनांचा लाभ घेऊन उत्पादन वाढवावे, अशी सूचनाही त्यांनी केली. शेतजमिनीचे अकृषी क्षेत्रात रूपांतर केवळ व्यापक जनहिताच्या पायाभूत प्रकल्पांसाठीच मर्यादित असावे. उपजाऊ जमिनींचे संरक्षण करण्यासाठी कठोर कायदे लागू करावेत, तसेच जमिनींच्या वापरातील बदलांवर सॅटेलाइट व डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे नियंत्रण ठेवावे, अशी मागणी त्यांनी केंद्र सरकारकडे कुलकर्णी यांनी केली.

तसेच शेतजमीन शेतीसाठीच वापरली जावी. त्यातूनही शेतकऱ्यांना जमीन विकावी लागल्यास सरकारने योग्य मोबदला देऊन ती खरेदी करून शेतीसाठीच वापर सुनिश्चित करावा, असेही त्यांनी सांगितले. कृषी क्षेत्र हे भविष्यातील महत्त्वाचे उद्योग ठरणार असल्याने त्याचे संवर्धन आणि संरक्षण ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.



## मॅट्रिमोनी साइटवरून महिलांची फसवणूक

*आदर्श म्हात्रेविरुद्ध राज्यभर गुन्हे; अनेक महिलांची आर्थिक व मानसिक फसवणूक; तपास सुरू*

नारायणगाव (दै. संध्या)

राज्यात भोंदू बाबांच्या प्रकरणांमुळे खळबळ उडालेली असताना नवी मुंबई परिसरातही अशाच स्वरूपाचे धक्कादायक फसवणुकीचे प्रकरण समोर आले आहे. आदर्श म्हात्रे (वय ३५) या तरुणाने मॅट्रिमोनी संकेतस्थळांचा वापर करून राज्यातील अनेक महिलांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी विविध ठिकाणी ५० हून अधिक गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी आर्थिकदृष्ट्या सक्षम, विशेषतः ३० वर्षांवरील अविवाहित, घटस्फोटित किंवा विधवा महिलांना लक्ष्य करत असे. मॅट्रिमोनी संकेतस्थळांवरून संपर्क साधून तो स्वतःला इस्रोमधील शास्त्रज्ञ किंवा आयएएस/आयपीएस अधिकारी असल्याचे भासवत विश्वास संपादन करत असे. यानंतर आलिशान जीवनशैलीचा आव आणत आरोपी महिलांशी जवळीक वाढवत असे. विश्वास निर्माण झाल्यानंतर संबंधित महिलांकडून मोठ्या रकमेची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. काही प्रकरणांत महिलांना त्यांच्या नावावर कर्ज (होम लोन) घेण्यास प्रवृत्त करून ती रक्कम इतर खात्यांमध्ये वळवून आरोपी पसार होत असल्याचा आरोप आहे.

या प्रकरणात आरोपीने विविध बनावट नावे आणि ओळखींचा वापर केल्याचेही उघड झाले आहे. स्वप्नील वारूळ, हेमंत गायकर, रुद्रेश गोंधळी, जयेश सोनवणे, जयेश नाईक, आदित्य म्हात्रे आणि तन्मय म्हात्रे अशा नावांनी तो वेगवेगळ्या महिलांशी संपर्क साधत होता.

ठाणे, नवी मुंबई, पुणे, नागपूर, नांदेड, नाशिक तसेच कर्नाटकातील काही भागांत या आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल आहेत. काही पीडित महिलांनी सामाजिक दबावामुळे तक्रार नोंदवण्यास नकार दिल्याचीही माहिती समोर आली आहे.

### पोलिसांकडून नागरिकांना आवाहन

मॅट्रिमोनी किंवा सोशल मीडियाद्वारे ओळख झालेल्या व्यक्तींवर लगेच विश्वास ठेवू नये. आर्थिक व्यवहार करताना योग्य पडताळणी करावी, तसेच संशयास्पद बाबी आढळल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## चिंचोली येथे शेतकरी मेळावा संपन्न

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील चिंचोली (काशीद) येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत कृषी विभाग, जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी मेळावा संपन्न झाला. यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थेत निवडून आल्याबद्दल पंचायत समिती सभापती कमलाताई शेळकंदे,उपसभापती अमित ढोले,जिल्हा परिषद सदस्य गुलाब पारखे यांचा सत्कार करण्यात आला. मेळाव्यात कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव येथील शास्त्रज्ञ वैभव शिंदे यांनी आधुनिक शेती तंत्रज्ञान पीक व्यवस्थापन व उत्पादन वाढीबाबत मार्गदर्शन केले. विशेषतः आंबा लागवड तंत्रज्ञान आणि संबंधित समस्यांवर त्यांनी माहिती प्रदान केली. या कार्यक्रमासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संतोष चव्हाण,माजी संचालक उत्तमराव काशीद, श्री समर्थ मराठा समाज मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष नवनाथ काशीद, वडजचे सरपंच सुनील चव्हाण, चिंचोलीचे उपसरपंच इम्रान चौगुले, ग्रामपंचायत सदस्या फसाबाई वाजे,पोलीस मित्र नवनाथ ताजणे तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी पूर्ण करण्यासाठी गटविकास अधिकारी प्रतीक चन्नावर,सहाय्यक गटविकास अधिकारी विठ्ठल भोईर,कृषी अधिकारी डी.पी रावते व विस्तार अधिकारी लक्ष्मण झांजे यांचे मार्गदर्शन लाभले.शेवटी आभार ग्रामपंचायत अधिकारी अर्चनाताई केदारी यांनी मानले.

## “रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान” – व्हाइस ॲडमिरल अनिल जग्गी

*एनडीएत आयोजित रक्तदान शिबिरात ८१ जणांचा सहभाग*

पुणे (दै. संध्या)




“मानवी जीवनात अनेक गोष्टींचे महत्त्व असले तरी जीवन वाचवणे ही सर्वात मोठी जबाबदारी आहे. रक्तदान हे त्यासाठीचे सर्वश्रेष्ठ दान असून प्रत्येक स्वस्थ व्यक्तीने यात सहभागी व्हावे,” असे प्रतिपादन व्हाइस ॲडमिरल अनिल जग्गी (एव्हीएसएम), कमांडंट, राष्ट्रीय संरक्षण अकादमी यांनी केले.

अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषद आणि सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालय (वानवडी, पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने २८ मार्च २०२६ रोजी खडकवासला येथील राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए) परिसरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत एकूण ८१ जणांनी रक्तदान केले.

या वेळी बोलताना व्हाइस ॲडमिरल जग्गी म्हणाले की, “रक्तदान म्हणजे सेवा, मानवता आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम आहे. रक्तदानाची प्रक्रिया अत्यंत सोपी असून तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली कोणतीही स्वस्थ व्यक्ती रक्तदान करू शकते. शरीरातील रक्ताची कमतरता अल्पावधीत भरून निघत असल्याने रक्तदान आरोग्यासाठीही उपयुक्त ठरते.” त्यांनी स्वतः पुढाकार घेत शिबिरात प्रथम रक्तदान करून इतरांना प्रेरणा दिली.

या शिबिरात एअर व्हाइस मार्शल राजेश वर्मा (व्हीएम), डेप्युटी कमांडंट, तसेच इतर वरिष्ठ अधिकारी आणि सैनिकांनी सक्रिय सहभाग नोंदवला. शिबिराचे समन्वयक प्रणल देखणे होते. यावेळी अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेचे महाराष्ट्र व गोवा राज्य अध्यक्ष एअर मार्शल प्रदीप बापट (निवृत्त), उपाध्यक्ष एअर व्हाइस मार्शल नितीन वैद्य (निवृत्त), एअर कमोडोर शैलेंद्र घारपुरे (निवृत्त), कर्नल उत्तम पाटील (निवृत्त), ग्रुप कॅप्टन श्रीकांत वालवाडकर (निवृत्त) तसेच सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉक्टर व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

सामाजिक बांधिलकी जपत रक्तदानाचे महत्त्व जनमानसात रुजवण्यासाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## वैभव कदम यांचा मा. आ. संजय जगताप यांच्या हस्ते गौरव

### एमपीएससी परीक्षेत यश : ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी यश



पुरंदर (दै. संध्या)

“सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे स्वतःवर विश्वास ठेवणं. परिस्थिती काहीही असो, आत्मविश्वास सोडू नका.एमपीएससीचा प्रवास सोपा नव्हता,जिद्द,चिकाटी, मेहनत, करून सातत्य ठेवल्यामुळे हे यश मिळालं, आई,वडील,शिक्षक,नातेवाईक मला सहकार्य करणारे सर्वजन त्यांचे मनापासून आभार मानतो.” **- वैभव कदम, कृषी अधिकारी, श्रेणी २**

पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील माळशिरस येथील वैभव विठ्ठल कदम यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत कृषी अधिकारी (श्रेणी-२) पदावर निवड मिळवली आहे. आदर्श शिक्षक विठ्ठल कदम यांचे सुपुत्र असलेल्या वैभव यांच्या या यशामुळे तालुक्यात सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरले आहे. या यशाबद्दल पुरंदर तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघ तसेच पुरंदर तालुका माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने वैभव कदम यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमात पुरंदर हवेलीचे माजी आमदार तथा महाराष्ट्र राज्य भाजपाचे चिटणीस संजय जगताप आणि महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव व राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श प्राचार्य नंदकुमार सागर आदी मान्यवरांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन वैभव कदम यांचा गौरव करण्यात आला.यावेळी सेकंडरी को-ऑप क्रेडिट सोसायटी,मुंबईचे उपाध्यक्ष सुधाकर जगदाळे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक संघाचे प्रवक्ते वसंतराव ताकवले,पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष रामप्रभू पेटकर,नायगावच्या सरपंच क्रांती पाटोळे,माहूर माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमंत पवार, पुरंदर तालुका माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष दत्तात्रय रोकडे तसेच सेवानिवृत्त संघाचे अध्यक्ष दिलीप पापळ,रवींद्र जगताप,उद्धव भगत,सुशांत कांबळे, विशाल कामथे,नवनाथ यादव,दीपक यादव,गोकुळ यादव, दत्ता जाधव,रामदास वाघले,बाळकृष्ण जिंजुरके, बाबुराव गायकवाड,नायगाव येथील आजी माजी पदाधिकारी,माळशिरस,पोंढे लिंबाचीवाडी, रिसे, पिसे, राजुरी,पंचक्रोशीतील ग्रामस्थ,पाहुणे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून वैभव कदम यांच्या यशामागील जिद्द, परिश्रम आणि कुटुंबीयांचे योगदान यांचा गौरव केला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे यश प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.उपस्थित शिक्षकवर्ग, मुख्याध्यापक व मान्यवरांनी वैभव कदम यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.




## मंदिर संस्कृती व परंपरा आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडणारा गुरव समाज घडला पाहिजे – विजयकुमार हरिश्चंद्रे

जेजुरी (दै. संध्या)

नव्या आधुनिक युगात वावरताना मंदिर संस्कृती आणि परंपरा अबाधित ठेवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे अत्यावश्यक आहे. प्राचीन परंपरा, धार्मिक ग्रंथ, तंत्र-मंत्र आणि संस्कार यांचा आधुनिक कार्यपद्धतीशी संगम साधण्यासाठी गुरव समाजातील युवा पिढी सज्ज झाली पाहिजे, असे प्रतिपादन दिग्दर्शक व पत्रकार विजयकुमार हरिश्चंद्रे यांनी केले. दौंड तालुक्यातील बोरमलनाथ येथे आयोजित राज्यस्तरीय गुरव संमेलनात विविध विषयांवर सखोल विचारमंथन करण्यात आले. राज्यभरातून मोठ्या संख्येने प्रतिनिधी उपस्थित राहिल्याने संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गुरव समाजाच्या सध्याच्या स्थितीचा आढावा घेत शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, कृषी आणि सांस्कृतिक क्षेत्रांतील प्रगतीसाठी दिशा ठरविण्यात आली. मंदिरांशी गुरव समाजाचे असलेले श्रद्धा, नाते आणि निष्ठा अधिक दृढ करण्यासाठी शेकडो पुजारी, संघटक आणि प्रतिनिधींनी कुटुंबासह उपस्थित राहून दैनंदिन धार्मिक संस्कार आणि आधुनिक शिक्षण यामध्ये समतोल राखण्याची शपथ घेतली. यावेळी गुरव विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष व संमेलनाचे संकल्पक नवल शेवाळे, बोरमलनाथ ट्रस्टचे अध्यक्ष कैलासआबा शेलार, मंदिर अभ्यासक पत्रकार विजयकुमार हरिश्चंद्रे, इनाम-वतन गुलामगिरी अभ्यासक डॉ. नितीन ढेपे, भीमाशंकर ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. सुरेश कौदरे, देवस्थान महसूल कायदे तज्ज्ञ रवींद्र क्षीरसागर, ज्योतिषतज्ज्ञ प्रवीण राजगुरू, प्रभाकर आचार्य, अखिल महाराष्ट्र गुरव संघटनेचे अध्यक्ष विजय क्षीरसागर, मोडी लिपी तज्ज्ञ ॲड. रिद्धी गुरव, मंदिर महासंघाचे अध्यक्ष सुनील घनवट, सदानंद बारभाई, पराग गोखले, अशोक मोरे, गणेश पोरे गुरुजी आदी मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### राजकारण आणि समाजकारण हे दोन वेगवेगळे विषय

कोरेगावमुळ, (दैनिक संध्या) : राजकारण आणि समाजकारण हे दोन वेगवेगळे विषय आहेत, पण बहुतेक वेळा ते एकमेकांशी जोडलेले असतात. राजकारण करणारे व्यक्ती समाजकारण करतात का, की समाजकारण करणारे व्यक्ती राजकारण करतात, हे कळणे कठीण आहे. आपल्या देशात एक गोष्ट घडली की, तिला आपण एवढी सामुदायिक करून ठेवतो की, सगळे त्या घटनेला जागरूक होऊन बघू लागतात. पण मुळी मुद्दा काय आहे, तो का घडत आहे, ह्याचे कारण कोणाला माहित असते?. राजकारण करणाऱ्या व्यक्तीने सत्तेपुरता विचार करू नये. आपल्या राजकारणाने कोणत्याही व्यक्तीचे नुकसान होऊ नये किंवा सामान्य जनतेला त्यापासून हानी पोहचू नये. राजकारण हे आपल्या देशासाठी आणि समाजासाठी असावे, ते माणसांत द्वेष पसरवण्यासाठी असू नये. समाजकारण करताना नक्की त्या सामाजिक विषयाला धरून समाजकारण करता का, उगाच आपले समाजकारण करून लोकांना भुरळ पाडण्याचा प्रयत्न करता? नक्की लोकांना काय हवे, ह्या गोष्टीचा खुलासा होणे गरजेचे वाटते. ह्या राजकारण आणि समाजकारण करणाऱ्या व्यक्तीमुळे आपल्या देशातील जनतेला धोका वाटतो. राजकारण करणाऱ्या व्यक्तिपासून दूर राहायला हवे असे त्यांना वाटते. ह्या व्यक्ती जिथे फायदा असतो, तिथे आपले काम करतात. खरच, आपल्या देशातील लोकांना आपला देश घडवायचा आहे की बिघडवायचा आहे, हेच कळत नाही. काही लोक असे असतात, त्यांना खरच आपल्या विचारातून देशाला सुरक्षित आणि शिक्षित ठेवायचे आहे. पण काही लोक असे आहेत, त्यांना आपल्या देशातील जनतेला दबावात आणि त्यांच्या विचाराप्रमाणे बिघडवायचे आहे. माणूस म्हणून प्रत्येक व्यक्तीला अधिकार आहेत, त्याला कसे जगायचे आणि कसे विचार मांडायचे. आपले विचार हे देशाला आणि आपल्या समाजाला पुढे घेऊन जाण्यासाठी असावे. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीने समाजकारण करा किंवा राजकारण करा, पण आपल्या देशाला सुरक्षित आणि शिक्षित ठेवा. शैक्षणिक पातळीवर असलेला व्यक्ती हा योग्य निर्णय घेऊन समाजाला आणि राजकारण योग्य रित्या ठेवून आपल्या जनतेला सुरक्षित ठेवू शकतो आणि समस्यांना तोंड देण्याची क्षमता त्या व्यक्तीत असते.

### पुणे भारत गायन समाज व गोपाळ गायन समाजाला प्रत्येकी 5 लाखांचा निधी

■ पुण्यातील नामवंत संगीत संस्थांना ज्येष्ठ रेडिओलॉजिस्ट डॉ. रामचंद्र उर्फ बाळासाहेब परांजपे यांच्यातर्फे देणगी प्रदान कार्यक्रम


स्व. बापूसाहेब उर्फ वि.रा. परांजपे व स्व. कमलाबाई परांजपे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ
डॉ. रामचंद्र विष्णू उर्फ बाळासाहेब परांजपे व सौ. रमा परांजपे यांच्या वतीने
देणगी प्रदान सोहळा
पुणे भारत गायन समाज व गोपाळ गायन समाज यांना देणगी अर्पण
✻ प्रमुख उपस्थिती ✻
श्री. रमेश भागवत (अध्यक्ष – देवदेवेश्वर संस्थान)
श्री. महेश सूर्यवंशी (कोषाध्यक्ष – श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट)
मंगळवार, दिनांक ३१ मार्च २०२६ वेळ : सकाळी १०.०० वाजता
स्थळ : पेशवे सभागृह, सारसबाग

पुणे (दैनिक संध्या) : संगीत व सांस्कृतिक क्षेत्राला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ज्येष्ठ रेडिओलॉजिस्ट डॉ. रामचंद्र उर्फ बाळासाहेब विष्णू परांजपे व त्यांच्या पत्नी रमा परांजपे यांनी एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. त्यांचे वडील स्व. बापूसाहेब उर्फ वि. रा. परांजपे व आई कमलाबाई परांजपे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ते पुणे भारत गायन समाज व गोपाळ गायन समाज या दोन प्रतिष्ठित संस्थांना प्रत्येकी रुपये पाच लाखांची देणगी देणार आहेत. हा देणगी प्रदान सोहळा मंगळवार, ३१ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता पेशवे हॉल, सारसबाग, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला श्री देवदेवेश्वर संस्थानचे अध्यक्ष रमेश भागवत तसेच श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच पुणे भारत गायन समाज संस्थेच्या शैला दातार, शिल्पा पुणतांबेकर, सावनी दातार या मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच गोपाळ गायन समाजातर्फे विकास कशाळकर , राधिका जोगळेकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी पुणेकरांनी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नायगाव येथे शेतकरी जागरूकता कार्यक्रम संपन्न

पुरंदर (दै. संध्या)




कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी देवस्थान ट्रस्टचे व्यवस्थापक राहुल कड व हवामान निरीक्षक दादासाहेब लोखंडे यांनी विशेष परिश्रम घेतले. चर्चासत्रात प्रगतशील शेतकरी विलास खेसे, प्रदीप खेसे, चंद्रकांत कड, संपत कड, हनुमंत मेमाणे, शिवाजी चौंडकर,अर्जुन पाटोळे,विजय कड,अजिंक्य कड,चंद्रकांत चौंडकर,संतोष गायकवाड यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. या कार्यक्रमास नायगाव परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांना ‘कृषी दर्शनी-२०२६’ तसेच विविध कृषी निविष्ठांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुहास जाधव यांनी केले.

पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील नायगाव येथे ग्रामीण कृषी मौसम सेवा प्रकल्पांतर्गत शेतकरी जागरूकता कार्यक्रम उत्साहात पार पडला. कृषी महाविद्यालय, पुणे येथील कृषि हवामानशास्त्र विभाग आणि भारत हवामान विभाग, शिवाजीनगर, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी महाविद्यालय, पुणे येथील माजी सहयोगी अधिष्ठाता डॉ. दशरथ ठवाळ होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रविण चोपडा उपस्थित होते. कार्यक्रमात सहयोगी प्राध्यापक डॉ. व्ही. एम. लोंढे यांनी ग्रामीण कृषी मौसम सेवा प्रकल्पाची माहिती देत शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांवर प्रकाश टाकला. संशोधन सहयोगी सुहास जाधव यांनी ‘Meghdoot’ व ‘Damini’ या मोबाईल ॲप्सची माहिती देत हवामान अंदाज व वीज पूर्वसूचना शेतकऱ्यांसाठी कशी उपयुक्त ठरते हे स्पष्ट केले. भारत हवामान विभागाचे महेंद्र चौधरी यांनी जिल्हा व तालुका स्तरावर दिल्या जाणाऱ्या पाच दिवसांच्या हवामान अंदाजाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पाऊस, तापमान, सापेक्ष आर्द्रता, ढगांचे आच्छादन, वाऱ्याचा वेग व दिशा या निकषांवर आधारित अंदाज कसा तयार होतो व त्याचा शेतीत कसा उपयोग करावा, याबाबत त्यांनी माहिती दिली. तसेच ए.एम.एफ.यू. (AMFU) मार्फत मंगळवार व शुक्रवार रोजी दिल्या जाणाऱ्या कृषी हवामान सल्ला पत्रिकेबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. अवकाळी पाऊस, गारपीट, वादळी वारे, उष्णलहर, शीतलहर, मेघगर्जना व चक्रीवादळे यांसारख्या तीव्र हवामान घटनांबाबत पूर्वसूचना कशा मिळतात व त्यानुसार शेतीचे संरक्षण कसे करावे यावरही त्यांनी मार्गदर्शन केले. मृदशास्त्रज्ञ डॉ. बी. एस. कदम यांनी जमिनीचे आरोग्य, सेंद्रिय घटकांचे महत्त्व, रासायनिक खतांचा संतुलित वापर, जीवाणू खतांचा वापर व स्फुरद विरघळविणाऱ्या जीवाणूंचे (पी.एस.बी.) महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली.

प्रमुख पाहुणे प्रविण चोपडा यांनी सेंद्रिय शेतीतील स्वतःचे अनुभव सांगत नैसर्गिक शेतीचे महत्त्व अधोरेखित केले व अशा शेतकरी मेळाव्यांचे आयोजन नियमित व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय समारोपात डॉ. दशरथ ठवाळ यांनी हवामान बदलाचा शेतीवर होणारा परिणाम, ऊस पिक व्यवस्थापन, ऊस पाचट कंपोस्ट खत व्यवस्थापन तसेच अंजीर बाग व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांचे पाठबळ लाभले. तसेच संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, अधिष्ठाता (कृषि) व संचालक शिक्षण डॉ. सताप्पा बी. खरबडे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे तसेच ग्रामीण कृषी मौसम सेवा (ए.एम.एफ.यू.), पुणे येथील प्रमुख अन्वेषक व विभागप्रमुख डॉ. श्रध्दा बगाडे यांचे मार्गदर्शन लाभले.